www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 271 वा रविवार दि. 15 जून २०२५ किंमत : 2 रु पृष्ठ : ४

## नागोठणे बाजारपेठेत प्लास्टिक व ताडपत्रींची मागणी वाढली

**दैनिक युवक आधार**

**नागोठणे वार्ताहर** – या वर्षी पावसाने मे महिन्यात जोरदार सुरुवात केल्यामुळे तसेच येथील विभागातील ग्रामीण भागात आदिवासी समाज मोठ्या संख्येत असल्याने पावसाळ्यापासून बचाव करण्यासाठी विविध ठिकाणी प्लास्टिक व ताडपत्रींचा वापर होत असल्याने येथील छत्रपती शिवाजी महाराज बाजार पेठेत प्लास्टिक व ताडपत्री बाजारपेठेत उपलब्ध झाले आहेत. त्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली असून प्लास्टिक व ताडपत्री खरेदी करण्यासाठी नागोठणे बाजारपेठेत ग्राहकांची गर्दी झाल्याचे दिसून येत आहे. पावसाळ्यात ग्रामीण भागात काही घरे कुडाची, विटा मातीची,कौलांची असल्यामुळे त्यांची दुरुस्ती करण्याची लगबग सुरु झाली असते. तसेच घरांवर, गाय- गोठे, लाकडी सामान पावसाच्या पाण्यापासून बचाव करण्यासाठी प्लास्टिक किंवा ताडपत्रीची गरज असते. शहरासह परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणात प्लास्टिकची खरेदी करीत असतात. आता बाजारात उपलब्ध असलेल्या प्लास्टिक कापडाची रुंदी विविध फुटांमध्ये असून तो काळया, पिवळ्या, निळ्या व सफेद रंगाचे प्लास्टिक देखील बाजारपेठेत मिळत आहेत, यांचा खूप उपयोग भर पावसात शेतात लावणी होत असून निळ्या रंगाच्या प्लास्टिक व ताडपत्री मोठ्या प्रमाणात खरेदी केल्या जातात. निळी ताडपत्री जाड असल्यामुळे टिकाऊ असते, ताडपत्री मिटर आणि फूटामधे तसेच ग्राहकांना आवश्यक त्याप्रमाणे विकल्या जातात. तसेच त्यांची रुंदी (पन्हा) 4,6,8 व 12 फुट मध्ये उपलब्ध असल्याची माहिती ताडपत्रीचे होलसेल विक्रेते संजय जैन यांनी दिली.



## ओवळीच्या हरिद्न्या शिंदे भारतीय नौदलात सब-लेफ्टनंट पदावर;

### चिपळूण तालुक्यातून नौदलात कमिशन्ड ऑफिसर होणाऱ्या पहिल्या महिला अधिकारी

**. दैनिक युवक आधार**
**चिपळूण:प्रतिनिधी**

तालुक्यातील ओवळी गावातील दसपटी येथील सुपुत्री सुश्री हरिद्न्या लीना एलके शिंदे यांनी भारतीय नौदलात सब-लेफ्टनंट म्हणून दाखल होऊन एक ऐतिहासिक कामगिरी केली आहे.

शनिवारी, एझिमला, केरळ येथे पार पडलेल्या भव्य पासिंग आऊट परेडनंतर त्यांनी भारतीय नौदलात आपला प्रवास अधिकृतरीत्या सुरू केला. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे चिपळूणकरांच्या मनात अभिमान व आनंदाची लाट उसळली आहे.

हरिद्न्या शिंदे या संपूर्ण चिपळूण तालुक्यातून भारतीय नौदलात कमिशन्ड ऑफिसर होणाऱ्या पहिल्या महिला अधिकारी ठरल्या आहेत. त्यांचा हा प्रवास अढळ दृढनिश्चय, शिस्तबद्ध प्रयत्न आणि उत्कृष्टतेच्या साधनेचे प्रतीक आहे.

त्यांच्या या ऐतिहासिक कामगिरीने ओवळी गावाचाच नव्हे तर संपूर्ण चिपळूण तालुक्याचा गौरव वाढवला आहे. त्यांचे यश अनेक नव्या पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.




# एअर इंडियाकडून मदत जाहीर, मृतांच्या नातेवाईकांना २५ लाखांची मदत देणार; टाटा सन्सचेही १ कोटी मिळणार.

विमान अपघातातील मृतांच्या नातेवाईकांना एअर इंडिया २५ लाख रुपये देणार आहे. टाटा सन्सने यापूर्वीच १ कोटी रुपये देणार असल्याची घोषणा केली होती. यामुळे आता मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येक व्यक्तीमागे १.२५ कोटी रुपये मिळणार आहेत.

आयुष्यात कधीच विमानात बसणार नाही; व्हिडीओ रेकॉर्ड करणाऱ्या आर्यनने घेतली धास्ती, पोलीस चौकशीनंतर...

गुरुवारी, १२ जून रोजी दुपारी १.३९ मिनिटांनी एअर इंडियाचेअहमदाबादहून लंडनला जाणारे विमान विमानतळाबाहेर




जाताच कोसळले होते. पायलटने मदतीचा मेसेज एअर कंट्रोलला देताना विमानाचे इंजिन फेल झाल्याचे सांगितले होते. विमानतळापासून दोन किमी अंतरावरील मेडिकल कॉलेजच्या हॉस्टेलवर हे विमान कोसळले. यामुळे मृतांचा आकडा वाढला आहे. या विमानातून एकूण २४२ जण प्रवास करत होते. तर हॉस्टेलच्या मेसमध्ये इंटर्न डॉक्टर जेवण करत होते. या कॉलेजच्या ३५ जणांचा या अपघातात मृत्यू झाला आहे. विमान अपघातातील मृतांचा आकडा आता २७५ झाला असून २४० जणांचे डीएनए घेण्यात आले आहेत. यापैकी सहा जणांचे डीएनए जुळले आहेत. अद्याप ४० हून अधिक लोकांवर उपचार सुरु आहेत. या विमान अपघातात एकच व्यक्ती वाचला आहे. डॉक्टरांच्या असोसिएशनने या अपघातात जीव गमावलेल्या डॉक्टरांना, विद्यार्थ्यांना तसेच कर्मचाऱ्यांनाही मदत करण्याचे आवाहन टाटा सन्सचे अध्यक्ष चंद्रशेखन यांना पत्र लिहून केले आहे. टाटा सन्सने उपचाराचा सर्व खर्च आपण करणार असल्याचे म्हटले आहे. तसेच बीजे मेडिकल कॉलेजला त्यांची इमारत पूर्ण बांधून देण्यास मदत करणार असल्याचे म्हटले आहे.

## शिवराज्याभिषेकदिन गौरव पुरस्कार २०२५ यशस्वी संपन्न!

**सहसंपादक मुकुंद कांबळे**
**दैनिक युवक आधार**

आज दिनांक ८ जून रोजी, दादर येथील मराठी ग्रंथ संग्रहालय मधील सुरेंद्र गावस्कर सभागृहामध्ये स्वराज्य प्रतिष्ठान, हुतात्मा बाबू गेनू स्मारक समिती आणि धडक कामगार युनियन महासंघ आयोजित, शिवराज्यभिषेक दिन गौरव पुरस्कार २०२५ संपन्न झाला!

या सोहळ्यात स्वराज्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष व समारंभ अध्यक्ष म्हणून आदरणीय मा.श्री. प्रमोद अप्पा पाटील साहेब, तसेच समारंभचे उद्घाटक म्हणून आदरणीय पद्मश्री मा. डॉ. तात्याराव लहाने सर, मुंबई मित्र व धडक कामगार युनियनचे अध्यक्ष व समारंभाचे विशेष उपस्थिती म्हणून मा.श्री. अभिजित दादा राणे जी, तानाजी मालुसरे यांचे १३ वे वंशज व समारंभाचे विशेष अतिथी म्हणून श्रीमती शीतलताई मालुसरे, मैत्री संस्थेचे अध्यक्ष व आयोजक सुरज भोईर जी, मा.श्री.संभाजीराव राजे जाधवराव, समारंभ स्वागताध्यक्षा अभिनेत्री व प्रसिद्ध सौंदर्य तज्ञ मा.श्रीमती स्वाती ओक, संस्थापक अध्यक्ष विद्याविहार शिक्षण समिती विरार व सन्माननीय अतिथी मा. मंगलाताई परब, कार्याध्यक्षा मराठा समन्वय परिषद महाराष्ट्र राज्य प्रमुख मा. शिवमती अनिताताई काळे, समाजसेविका व उद्योजिका व प्रमुख उपस्थिती म्हणून मा. संगीताताई गुरव, समाजभूषण व पोलीस मित्र व सन्माननीय अतिथी मा. दिलीप नारद आणि इतर मान्यवर उपस्थित होते. तसेच या सोहळ्यात शंभरहून अधिक साहित्यिक,सामाजिक,कलाक्षेत्रात असलेल्या व्यक्तींना त्यांच्या कार्याबद्दल शिवराज्यभिषेक दिन गौरव २०२५ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.




## मैथिली पाटील कुटुंबीयांचे प्रीतम म्हात्रे यांनी केले सांत्वन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

न्हावे गावातील मैथिली पाटील यांच्या दुःखद निधनानंतर भाजपचे नेते प्रीतम म्हात्रे यांनी त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. संकटाच्या या कठीण काळात प्रीतम म्हात्रे यांनी त्यांच्या दुःखात सहभागी होत मानसिक आधार दिला. यावेळी प्रीतम म्हात्रे यांनी संपूर्ण कुटुंबियांच्या सोबत खंबीरपणे उभं राहण्याचा विश्वास व्यक्त केला.



अहमदाबादमधील विमान अपघातात पनवेल तालुक्यातील न्हावा गावातील मैथिली मोरेश्वर पाटीलचा हिचा दुर्दैवी मृत्यू झाला. न्हावा गावातील हवाई सुंदरी मैथिली मोरेश्वर पाटील हिच्या दुःखद निधनाने न्हावा गावावर शोककळा पसरली आहे. प्रीतम म्हात्रे यांनी मैथिलीच्या कुटुंबीयांची न्हावा येथे जाऊन भेट घेतली. न्हावा गावावर पसरलेली शोककळा पाहून प्रीतम म्हात्रे यांनाही तीव्र दुःख झाले. विमान अपघाताची घडलेली ही घटना अतिशय वेदनादायक असून न्हावा गावच्या कन्येचे या दुर्दैवी अपघात निधन झाल्याचे समजताच गावात स्मशानशांतता पसरली आहे. यावेळी न्हावा गावचे माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे उपस्थित होते.

## सुट्टीवर आलेल्या जवानाचा विजेच्या धक्याने मृत्यू; शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा विभागीय प्रतिनिधी**
**:-राजू शिंदे.**

गारटेकी (ता. मंठा) : गावात सुट्टीवर आलेल्या जवानाचा विजेच्या शॉकने दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना मंठा तालुक्यातील गारटेकी येथे घडली. पवन शेषराव पवार (वय ३३) असे या जवानाचे नाव आहे. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी (ता. १४) शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी आर्मीचे वरिष्ठ अधिकारी, पोलिस व महसूल प्रशासनाच्या वतीने मानवंदना देण्यात आली. पोलीस प्रशासनाने हवेत गोळीबाराच्या सात फैरी झाडून साश्रुनयनाने अंतिम सलामी दिली. या अंत्यविधीस राजकीय नेते, प्रशासनातील अधिकारी तसेच परिसरातील हजारो ग्रामस्थ उपस्थित होते. पवन पवार हे मागील १२ वर्षांपासून सैन्य सेवेत कार्यरत होते. दोन दिवसांपूर्वीच ते सुट्टीवर गावी आले होते. शुक्रवारी (ता. १३) दुपारी पावणे चारच्या सुमारास ते घरा शेजारी असलेल्या झाडांच्या फांद्या छाटत होते. यावेळी घरावरून गेलेल्या विद्युत तारांचा त्यांना धक्का बसला. नातेवाईकांनी तातडीने त्यांना मंठा येथील शासकीय रुग्णालयात हलवले; मात्र उपचारादरम्यान सायंकाळी सातच्या सुमारास डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. पश्चात त्यांच्या पत्नी, एक मुलगी, आई-वडील, एक भाऊ व एक बहीण असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अकस्मात निधनाने गारटेकी गावावर शोककळा पसरली असून देशाचा एक शूर जवान हरपल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.









# संपादकीय

## १५ जून जागतिक पितृदिन

विषयः-जीवनात प्रत्येक वादळात खंबीरपणे उभे राहणारे फक्त माय-बापच! वडिलांचा मानसन्मान व्हावा या उद्देशाने जगात दरवर्षी जून महिन्याच्या तिसऱ्या रविवारला पितृदिन (फादर्स डे) साजरा केला जातो.त्या अनुषंगाने यावर्षी पितृदिन (फादर्स डे) १५जून २०२५ रोज रविवारला येत आहे. त्यामुळे पितृत्व आणि मातृत्व या परीभाषांशी किती जवळच आणि रक्ताच नात असते हे आपल्याला आई-वडील या शब्दावरूनच सहज समजून येते. या जगात माय-बापा शिवाय मोठा कोणीही नाही. आई-वडील, माय-बाप या शब्दाला सुध्दा कुठेही तोड नाही.कारण आई- वडील हा शब्द फक्त मानवजाती पुरताच सीमित नसून संपूर्ण जीवसृष्टी, पशुपक्षी या शब्दाशी घनिष्ठ व निगडित आहे. तेव्हाच आपल्याला उत्पत्ती,संस्कार,संस्कृती,जडण-घडण सर्वत्र दिसून येते. ज्याप्रमाणे आई-वडील मुलांची जोपासना करते. त्याचप्रमाणे पशुपक्षी व संपूर्ण जीवसृष्टी आपल्या पिल्लांची (मुलांची) जोपासना करून लहाण्याचे मोठे करतात. ही ईश्वरी देणच आहे.त्यामुळे या जगात आई-वडीला पेक्षा कोणीही मोठा नाही.कारण वडीलांवर आपल्या मुलांचीच नाही तर संपूर्ण कुटुंबाची मोठी जबाबदारी असते.त्यामुळे आर्थिकदृष्ट्या व इतर बाबतीत सुरक्षेची ढाल बनून वडील आपले कार्य तत्परतेने करीत असतो.त्यामुळे आई-वडीलांची भुमिका समान असते. आई नेहमी मायेच पांघरूण घालत असते तर वडील पहाडासारखा संपूर्ण कुटुंबाची रक्षा करून सुरक्षा कवचची भुमिका निभवत असतो.सर्वांनीच आई- वडीलांची सेवा व सन्मान करायला हवा.वडीलांचा मानसन्मान करून पितृ दिवस हा तर दररोज साजरा करायला पाहिजेच. परंतु जगाला जान रहावी म्हणून ठराविक दिवशी पितृ दिनाला महत्व आहे. पितृ दिन असो किंवा मातृ दिन दोन्ही दिवस एकसमानच असतात. कारण मातृदिनाचा इतिहास १८६० या दशकाशी संबंधित आहे.त्यामुळे सर्वप्रथम मातृदिनाची सुरूवात अमेरिकेतुन झाली. यानंतर पितृदिनाची मागणी व्हायला लागली.१९०७ मध्ये प्रथमच पितृदिन अनधिकृतपणे साजरा करण्यात आला. यानंतर अधिकृतपणे १९१० ला पितृदिनाला सुरूवात झाली. मात्र पितृदिन साजरा करण्याच्या तारखांमध्ये मतभेद आहेत. मातृत्व दिन(मदर्स डे) प्रमाणेच वडिलांचा आदर सन्मान व्हावा व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पितृदिन (फादर्स डे) साजरा केला जातो.जगात आई-वडील या शब्दाला कुठेही तोड नाही.कारण जगातील कोणतीही भाषा असो मामा-मामी, काका -काकु,माऊशी-मावसा, आत्या-मामा,ताई-दादा,आजी-आजोबा इत्यादी अनेक नाते आहेत व यासाठी वेळोवेळे शब्दप्रयोग सुध्दा आहेत.परंतु जगातील कोणत्याही कानाकोपऱ्यात जा तुम्हाला आई-वडील यांच्यासाठी एकच शब्द दिसेल. उदाहरण द्यायचे झाले तर आई-बाबा, मम्मी -पप्पा अशाप्रकारे जगात एकच शब्द आपल्याला आई-वडीलांसाठी दिसून येईल ही एक सृष्टीची लिलाच म्हणावी लागेल.मानवी नातेसंबंध आणि जगातील वेगवेगळ्या नात्यातील एक नातं म्हणजे वडिलांच नात असते.वडीलांच आणि मुलांचे नाते म्हणजे समुद्रातील पाण्यासारख अफाट असते.कारण प्रत्येक आई मुलांना घडवीते सुसंस्कृत करते व पदोपदी मुलांची काळजी घेते यातच मातृत्व दडलेले दिसून येते.कारण आई मुलांच्या सानिध्यात चोवीस तास असते.त्यामुळे आपले मुल काय करीत आहे आणि आपण त्यांच्यासाठी काय केले पाहिजे याची सटीक चाहूल फक्त आईलाच कळते व त्यापध्दतीने मुलांचे संगोपन करीत असते.आई अशी दैवी शक्ती आहे की मुला-मुलीनसाठी आकाश-पाताळ एक करते. परंतु मुलाला कधीच उपाशी ठेवत नाही.आई घरातील सर्वांचे जेवण झाल्यावरच जेवण करीत असते.आई-वडीलांच नातं या भुतलावर अफाट असुन न भूतो न भविष्यती अशाप्रकारचे हे नाते आहे.कारण वडिल भुक- तहान विसरून आपल्या कुटुंबाकरीता राबत असतो व घरग्रहस्ती चालवीतो. म्हणजेच घराला आर्थिक बळ देण्याचे काम वडिल करीत असतात तर वडिलांनी केलेल्या कमाईच्या आधारे घर चालवण्याची मोठी जबाबदारी आईची असते. कारण मोजक्या पैशात आईला घर चालवायचे असते.म्हणजे घरात काय कमी जास्त आहे हे सर्व आईलाच पहावे लागते व ही तीची मोठी कसोटीची परिक्षा असते. समाजात आईच्या कार्याला तोड नाही व वडिलांच्या कर्तुत्वाला कोणीही मात करू शकत नाही.म्हणुन सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजे की आपले खरे गुरु व दैवत आई-वडीलच त्यामुळे आजच्या तरुण पिढीने आई-वडीलांना प्रथम स्थानावर ठेवले पाहिजे. आई या शब्दाला किती महत्त्व आहे हे आपण या ओवी वरून समजू शकतो. आई माझा गुरु,आई कल्पतरू सुखाचा सागर आई माझी, प्रीतीचे माहेर, शांतीचे आगर मांगल्याचे सारं आई माझी. म्हणजे आईविना जग नाही व वडीलांविना आधार नाही. आपल्याला थोडीशी जरी इजा किंवा दुर्घटना झाली तर मुलं आईग म्हणून किंचाळतो तेव्हा आईच्या रूपात कोणीना-कोणी अवश्य धावुन येतोच ही दैवी शक्ती आई या शब्दात आपल्याला दिसुन येते.या उलटं वडिलांचे आहे.एखादी मोठी दुर्घटना घडली तर प्रत्येक व्यक्ती बापरे म्हणून जोरांनी ओरडतो अशा वेळी ताबडतोब आजुबाजुला असलेले नागरिक वडिलांची भूमिका बजावतात. म्हणजेच वडील तीथेच नसतांना सुध्दा तेथील संपूर्ण नागरिक वडिलांची भूमिका बजावतात. अशा वेळी आपणही म्हणतो की लोक देवासारखे धावुन आले. म्हणजे आईग आणि बापरे या कठीण शब्दांसामोर सर्वसामान्य माणूस आपल्या आई-वडिलांची भुमिका बजावतात व दैवी रूपाने मदतीला धावून येतात. मानवजातीमध्येच ज्याप्रमाणे आईची भूमिका असते त्याचप्रमाणे संपूर्ण पशुपक्षी व जीवसृष्टीमध्ये आईची भूमिका अग्रगण्य असल्याचे आपल्याला दिसून येते.कारण मुलांच्या आयुष्यात नेहमीच ती सुर्याच्या प्रकाशाप्रमाणे वावरत असते जेणेकरून मुलांच्या आयुष्यात कुठेही अंधक्कार पडणार नाही याची काळजी घेत असते.कारण आई आपल्या मुलांसाठी आपल्या जीवाचा आटापिटा करून मुलाला लहाण्याचा मोठा करते.त्यामुळे आज सर्वांचीच प्रथम जबाबदारी आहे की आपल्या आई-वडिलांची सेवा करने,पालनपोषण करणे, त्यांच्या प्रकृतीची काळजी घेणे व त्यांच्या वेदना जाणुन घेऊन त्यांवर उपाययोजना करणे आणि आई-वडीलांना सुखी व समाधानी ठेवणे यातच आपल्याला खरा जागतिक पितृदिन दीसुन येईल.माझ्यामते पितृदिन ठराविक दिवशीच का साजरा करावा.दररोज का साजरा का करू नये? मी तर म्हणेन की मातृत्व-पितृत्व दिवस हा दररोज आई-वडीलांची सेवा करून साजरा केला पाहिजे व आपण ते दिवस आठवायला पाहिजे की आपल्याला लहाण्याचे मोठे करण्यासाठी आईने कीती यातना व दुःख सहन केले असावे.याची जाणीव आज मुलांनी ठेवण्याची गरज आहे.कारण आईने आपल्याला वटवृक्षाच्या छायेत लहाण्याचे मोठे केले व याच वटवृक्षाचा पहारेकरी म्हणून वडिलांनी आपली चोख भुमिका बजावली. आई-वडीलच्या तत्परतेमुळेच मुलांच्या केसालाही धक्का लागत नाही ही दैवी शक्तीच म्हणावी लागेल.पितृत्व दिनाच्या निमित्ताने मी सर्वांना हेच सांगु इच्छितो की आपण सर्वांनी भारतीय संस्कृती जपायला हवी यातुनच आपल्याला खऱ्या अर्थाने आई-वडीलांची सेवा करता येईल.पाश्चिमात्य देशात आई-वडील सोडून इतर नातेसंबंध अंकल व अटी या दोन शब्दात संपुष्टात आली आहे.परंतु भारतीय संस्कृतीत आजी- आजोबा,काका-काकु,मामा-मामी, आत्या-मामा,ताई-दादा इत्यादी अनेक वेगवेगळे शब्द आपल्याला वेगवेगळ्या नात्यांप्रमाणे दिसून येतात त्यांचा सन्मान व्हायलाच पाहिजे. त्यामुळे अंकल-अन्टी हे पाश्चिमात्य शब्द विसरायला हवे. त्याचबरोबर मम्मी-पप्पा या शब्दांना पुर्णविराम देऊन आई-बाबा असे शब्द ऐकू आले तर भारतीय संस्कृतीचा सन्मान अवश्य होईल असे मला वाटते. आपण १५ जूनला पितृदिन (फादर्स डे) साजरा करीत असतांना पृथ्वी मातेचाही थोडासा विचार करायला हवा.कारण आज पृथ्वीची जोपासना होत नसल्याने निसर्ग दिवसेंदिवस कोपत आहे.याकरीता जागतिक पितृत्व दिनाचे औचित्य साधून प्रत्येक मुलांनी आई-वडीलांच्या आठवणीत रहावे यासाठी आजच्या दिवशी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.यामुळे एकाच दिवशी देशासह संपूर्ण जगात करोडोंच्या संख्येने वृक्ष लागवड झाल्याचे आपल्याला दिसून येईल.यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थिर रहाण्यास मोठी मदत होईल व आई-वडीलांना निसर्गाचा आनंद घेता येईल.कारण आज बदलत्या हवामानामुळे निसर्ग दिवसेंदिवस ढासळत आहे.त्यामुळे आई-वडीलांपेक्षा मोठी आणि महान म्हणजे धर्तीमाता (पृथ्वी) ज्यामुळे आज आपण या पृथ्वीतलावर सुखरूप आहोत.परंतु वाढत्या शहरीकरणामुळे व औद्योगिकीकरणामुळे जंगलतोड मोठ्या प्रमाणात होत असल्याने पृथ्वीमाता आज धोक्याच्या उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे.त्यामुळे तीला वाचविण्याची जबाबदारी आज आपल्या सर्वांवर आली आहे. करिता पृथ्वीला आई-वडीलांचा दर्जा देवून मोठ्या प्रमाणात सर्वच स्तरातून वृक्षलागवड व्हायला हवी.यामुळे मानव,पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतूच्या रक्षणासाठी मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित ठेवण्यासाठी आणि ऑक्सिजनची मात्रा वाढविण्याच्या दृष्टीने हा आगळावेगळा उपक्रम ऐतिहासिक ठरेल.


लेखक

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )नागपूर.**

## 15 मार्च 2024 चा शिक्षक पदसंख्येत कपात करणारा शासन निर्णय तात्काळ रद्द करा – शेख अब्दुल रहीम यांची ठणठणीत मागणी

### "स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांचे अस्तित्व धोक्यात!"

**दैनिक युवक आधार**
**मुंबई/छत्रपती संभाजीनगर :** हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तसेच महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनेचे राज्य प्रवक्ते शेख अब्दुल रहीम हे मुंबई दौऱ्यावर असताना, दुसऱ्या दिवशीही राज्यातील शिक्षक व विद्यार्थ्यांच्या हितासाठी विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले आहेत. 15 मार्च 2024 व 5 सप्टेंबर 2024 रोजी निर्गमित झालेल्या शासन निर्णयांमुळे शिक्षण हक्क कायदा 2009 मधील तरतुदींशी विसंगत अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या निर्णयांमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांचे अस्तित्वच संकटात सापडले आहे. या नवीन निकषांनुसार शिक्षकांची पदसंख्या कमी करण्यात आली असून, ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमध्ये मुख्याध्यापक, विषय शिक्षक व प्राथमिक शिक्षकांची संख्या मोठ्या प्रमाणात घटली आहे. परिणामी अनेक वर्ग बंद होण्याच्या मार्गावर आहेत, आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान अपरिहार्य झाले आहे. या पार्श्वभूमीवर दिनांक 15 मार्च 2024 चा जाचक व अन्यायकारक शासन निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा व पूर्वीप्रमाणेच संचमान्यता निकष लागू करण्यात यावेत, अशी ठाम मागणी शेख अब्दुल रहीम यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार व एकनाथ शिंदे यांच्याकडे थेट मंत्रालयात निवेदनाद्वारे केली आहे. हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनकडून शिक्षक व विद्यार्थ्यांच्या भविष्याचा गंभीर प्रश्न मांडत शासनाला जागवण्याचा प्रयत्न सुरू असून, पुढील काळात आंदोलनाची शक्यता नाकारता येत नाही.



संग्रहित...

## बाप

बाप तो बापच असतो,
कुटुंबाच्या गरजांसाठी,
सकाळी घराबाहेर पडतो,
रात्री थकून भागून, मरगळलेला येतो,
कसेबसे अन्न पोटात ढकलून,
निद्रेच्या स्वाधीन होतो.!

बाप तो बापच असतो,
कुटुंबाच्या सुखासाठी,
आवडी निवडीला फाटा देतो,
स्वतः भोकाची बनियन अन
फाटकी विजार घालतो,
त्याची ऐपत नसतांना,
मुलांसाठी पांढरा शुभ्र ड्रेस अन
चकाकणारे बूट आणतो.!

बाप तो बापच असतो,
वादळ, वारा, पाऊस पाण्याची, त्याला पर्वा
नसते,
कमरेभर पाण्यातून रस्ता काढीत,
खाडा न करता, कामावर हजर होतो,
हा सर्वस्वी कुटुंबासाठी
कर्तव्यप्रचुर त्याग असतो.!

बाप हा बापच असतो,
कधीतरी जवळ जाऊन विचारले का,
बाबा, तुझं काही दुखतंय का?
तुला काही हवय का?
तुझ्या आवडीचे काही आणू का?
तुमच्या प्रश्नातच त्याचे पोट तुडुंब भरते ,
मन प्रसन्न होऊन, पंख मिळाल्यागत
आकाशात उंच भरारी घेते,
त्याला तुमच्याकडून काहीही अपेक्षा
नसते,
फक्त तो दोन आपुलकीच्या शब्दांचा
भुकेला असतो.!

फक्त तो दोन आपुलकीच्या शब्दाचा
भुकेला असतो.!!

फक्त तो दोन आपुलकीच्या शब्दांचा
भुकेला असतो.!!!



## वरखेडी येथे वादळी वाऱ्या सह घरांचे पत्र उडाले तर पाऊसाने मोठ्या प्रमाणात झोडपले

### घराचे पत्रे – उड्याल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान

**दैनिक युवक आधार**
**जळगाव जिल्हा प्रतिनिधी**
**समाधान पाटील**

एरंडोल - तालुक्यातील वरखेडी गावांत बुधवारी रात्री वादळी वाऱ्या सह पावसामुळे मोठे प्रमाणात नुकसान झाले असुन अनेकांच्या घरांची पत्रे उडाले, तर वृक्ष उन्मळून पड़ल्याने घरांचे नुकसान झाले. सुदैवाने जीवितहानी झालेली नाही . बुधवारी रात्री वादळी. वाऱ्यासह विजांचा कडकडाटात आलेल्या पावसाने तालुक्यातील वरखेडी येथील भावलाल पाटील, याच्या घरांचे पत्र उडाल्याने घरातील कडधान्य पावसात भिजल्याने त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. गावांमध्ये वादळी वारासह मोठ्या प्रमाणात घरांचे पत्रे उडून मोठे नुकसान झाले आहे. रामलाल पाटील यांच्या शेतातील गोठ्याचे पूर्णपणे नुकसान होऊन त्यात चारा पुर्णपणे भिजल्या ने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले . रात्रीपासून विद्युत वितारण कंपनीचे पोल व झाडे पडल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले वीजप्रवाह सुरळीत करण्यासाठी विद्युत वितरण कंपनीचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे मात्र अद्यापही वीज आलेली नसुन तिन दिवसा पासून गावात वीज पुरवठा खंडित झाला आहे.तो पुन्हा कधी सुरळीत होणार.




## गोपाल नगर येथे गावठी मोह दारू प्रो रेड करून नष्ट पोलीस निरीक्षक शितल मालटे यांची धडक कारवाई

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी**
**:-जितेंद्र खोडे**

राळेगावः-तालुक्यातील गोपालनगर पारधी बेड्यावर दिनांक १३-०६-२५ रोजी सकाळी ०७:०० वाजता पोलिस स्टेशन राळेगांव हद्दीतील गोपालनगर पारधी बेडा येथे प्रो रेड केले असता आरोपी किसन मेहबूब काळे वय ३१ वर्ष रा. गोपालनगर यांचे घरात झडतीमध्ये घरासमोरील बाथरूम मध्ये ०३ निळ्या रंगाच्या प्लास्टिक ड्रम मध्ये प्रत्येकी १०० लिटर प्रमाणे ३०० लिटर सडवा मोहाचा किंमत ३०,०००/- रू आणि आरोपी पदम विठू काळे वय ३६ वर्ष रा. गोपालनगर यांचे घर झडतीमध्ये घराचे मागे ०२ निळ्या रंगाच्या प्लास्टिक ड्रम मध्ये प्रत्येकी १०० लिटर प्रमाणे २०० लिटर सडवा मोहाचा किंमत २०,०००/- रू असा एकूण ५०,०००/- रू चा मुद्देमाल मोक्यावर नष्ट करण्यात आला. आरोपीला माहिती मिळताच घटनास्थळावरून आरोपी पळून गेले, आरोपीतांवर पो.स्टे. येथे गुन्हे दाखल करण्यात आले आहे,पोलिस निरीक्षक शितल मालते यांचे मार्गदर्शनामध्ये एएसआय अनंता इरपाते, एलएचसी प्रिया बारेकर, एनपीसी रूपेश जाधव यांनी कारवाई केली.



## शाळा, कॉलेज मधून टि. सी.काढण्यासाठी, कसल्याही प्रकारची फिस लागत नाही.

### फिस घेणाऱ्यांवर कारवाई

**दैनिक युवक आधार**
**उदगीर प्रतिनीधी,**
**बालाजी तेलंगे**

16जून 2025पासून शाळा सुरू होणार असुन काही पालक आपल्या पाल्यांना इयत्ता पहिली वर्गात प्रवेश घेणार आहेत तर काही पालक आपल्या पाल्यांचे प्रवेश पुढील वर्गात घेणार आहेत. ग्रामीण भागात बऱ्याच खेड्यात गावात फक्त इयत्ता चौथी वर्गापर्यंत चे वर्ग असलेली शाळा असते तर काही ठिकाणी फक्त इयत्ता सातवी वर्गापर्यंत, चे वर्ग असलेली शाळा असते. तर काही ठिकाणी फक्त दहावी वर्गापर्यंत चे वर्ग असलेली शाळा असते. या वेळी पुढील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना, टी. सी. म्हणजेच शाळा सोडण्याचे प्रमाण पत्राची गरज असते.

अशा वेळी आपली टी. सी. काढण्यासाठी कसल्याही प्रकारची फीस शाळेला, कॉलेज ला, घेण्याचा अधिकार नाही. हा नियम जिल्हा परिषद शाळेसाठी, खाजगी अनुदानित शाळेसाठी,विनाअनुदानित, शाळा मराठी माध्यमासाठी, लागू आहे.

असे असताना जर शाळेने, टी. सी. साठी पालकांकडे,विद्यार्थ्याकडे, फिसची मागणी केली असता तक्रार आल्यास त्या शाळेवर, जबाबदार व्यक्तीवर कारवाई केली जाईल, असे उदगीर येथील गट शिक्षण अधिकारी शेख यांनी पालकांना, विद्यार्थ्यांना आव्हान केले आहे.

## मनसे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त कळंब तालुक्यातील माऊली वृद्धाश्रम धोत्रा व ग्रामीण रुग्णालय राळेगांव येथे भोजन वितरण

### ( जिल्हा उपाध्यक्ष शंकर वरघट यांचा सामाजिक स्त्युत उपक्रम )

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः-**
**जितेंद्र खोडे**

**राळेगावः-** मनसे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त कळंब तालुक्यातील माऊली वृद्धाश्रम धोत्रा व ग्रामीण रुग्णालय राळेगांव येथील रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मनसेच्या वतीने भोजन वितरीत करण्यात आले.महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या संस्थापक अध्यक्ष मराठी हृदयसम्राट राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त कळंब तालूक्यातील माऊली वृद्धाश्रमात वृध्दां सोबत केक कापुन मोठ्या उत्साहात वाढदिवस साजरा करून नंतर तेथील वृध्दांना मिष्टान्नभोजन देण्यात आले. त्यानंतर राळेगांव ग्रामीण रुग्णालयातील रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना सुध्दा मोफत भोजन वितरीत करण्यात येवुन सामाजिक बांधिलकी जोपासण्याचा उपक्रम मनसे जिल्हा उपाध्यक्ष शंकर वरघट यांनी राबविला. मनसे जिल्हा उपाध्यक्ष शंकर वरघट नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर राहत असुन मनसे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांनी आपला वाढदिवस समाजिक उपक्रमांनी साजरा करण्याचे आवाहन कार्यकर्त्यांना केले होते.



त्याच अनुषंगाने मनसेच्या वतीने कळंब येथील वृद्धाश्रमातील वयोवृद्ध नागरिक, आणी ग्रामीण रुग्णालयातील रुग्ण व नातेवाईकांना मोफत जेवण वितरीत करण्यात येवुन राजसाहेब ठाकरे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी सुरज लेनगुरे,आरिफ शेख, संदीप गुरनुले,संदीप कुटे,शैलेश आडे, सचिन आत्राम,रोशन गुरुनुले,मंगेश मोहुर्ले,राहुल भोयर,भोजराज चौधरी, उमेश पेन्दोर,गौरव चवरडोल,स्वप्नील नेहारे,ओम मडावी,अंकित चौधरी, कुणाल चिंचालकर,कुणाल मोहुर्ले, तुषार वाघमारे,सुहास उमाटे,रोशन गुरनुले,खुशाल राऊत सह अन्य महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

### भारतीय जनता पार्टी मुस्लिम समाजाला देणार का न्याय...?

## कित्येक वर्षांपासून मुस्लिम समाज पक्षात प्रमुख पदापासून वंचित

### संघ स्वयंसेवक म्हणून मिरवणारा कार्यकर्ता शौकत तंवर

**दैनिक युवक आधार**
**आर्णी तालुका प्रतिनिधीः-देवा पवार**



आर्णीः-राज्यात च नव्हे तर जवळ जवळ संपूर्ण देशातच भारतीय जनता पक्ष व मित्र पक्षाचे सरकार जाळ्या सारखे पसरवले गेले आहे, भाजप मध्ये सर्वच समाजाकरीता एक वेगळी सेल (आघाडी) म्हणून पक्षात संघटन आहे,मात्र भाजपच्या मुख्य कार्यकारिणी मध्ये सर्व समावेशक जातीची लोकं दिसून येतात. मुख्यतः पक्षात प्रमुख पद म्हणजे पक्षाध्यक्ष या पदावर सर्वच समाजाने नेतृत्व केल्याचे दिसून येते, परंतु आजवर कधीच भाजप ने पक्षाचे अध्यक्ष पद, जिल्हाध्यक्षपदी, तालुकाध्यक्ष पदी कधीच मुस्लिम समाजाला संधी दिली नाही. यात भाजप मध्ये निःस्वार्थ पणाने काम करणारे सच्चे मुसलमान देखील आहेत, ज्यांनी आपलं उभं आयुष्य पक्षात खर्च केलंय, त्यांना मात्र एकनिष्ठतेचा कोणताही फळ मिळालेला नाही.आर्णी शहरातील शौकत तंवर नामक मुस्लिम कार्यकर्ता जो पक्षाशी कित्येक वर्षांपासून एकनिष्ठ राहून काम करत आहे, जे संघाचे स्वयंसेवक म्हणून मिरवतात अश्या कार्यकर्त्याला भाजपने तालुकाध्यक्ष म्हणून एक संधी द्यायला हवी अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे..

## मोरवाडी, पिंपरी-चिंचवड येथील भाजपा मध्यवर्ती कार्यालयात पत्रकार परिषद .

**दैनिक युवक आधार.**
**श्री.शिवाजी वाघमारे**
**चिखली, पिंपरी-चिंचवड .पुणे**

पिंपरी चिंचवड - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने ११ वर्षे पूर्ण केल्याबद्दल पिंपरी चिंचवड शहर भाजपाने मोरवाडी येथील भाजपा मध्यवर्ती कार्यालयात आयोजित पत्रकार परिषद घेतली मोदी सरकारने आत्मनिर्भर भारत ते विकसित भारत अशा यशस्वी कार्यकाळाचा आढावा घेतला, भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे बापू यांनी यशस्वी पत्रकार परिषद घेऊन संपूर्ण मोदी सरकारचा विकासाचा पाढा वाचला मोदी सरकारचा सेवा,सूशासन आणि गरीब कल्याण या त्रिसूत्री कार्यक्रमाचे आयोजन, विविध विकास योजना, महत्वपुर्ण निर्णय क्षमता असलेले आणि यशस्वी प्रभावी उपक्रम राबविले जातात अशी सविस्तर माहिती पत्रकार परिषदेत दिली.

या वेळी उपस्थित आमदार अमित गोरखे,आमदार उमाताई खापरे, माजी खासदार अमर साबळे, माजी आमदार अश्विनीताई जगताप, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनूप मोरे , दक्षिण आघाडी प्रदेशाध्यक्ष राजेश पिल्ले, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, प्रदेश सदस्य मोरेश्वर शेडगे, महेश कुलकर्णी, चंद्रकांत नखाते, संतोष कलाटे, महिला मोर्चा अध्यक्ष सुजाता पालांडे, सोशल मीडिया प्रभारी संजिवनी पांडेय,अमेय देशपांडे आदी मान्यवर उपस्थित होते




## मायभूमी फाउंडेशनकडून पर्यावरण दिनाचे औचित्य साधत ३१ वटवृक्षांची सामूहिक लागवड

### चासनळी परिसरात पर्यावरण रक्षणासाठी नवा उपक्रम, ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

**विंचूर :-** परिसरातील चासनळी येथील निस्वार्थ सामाजिक कार्यासाठी प्रसिद्ध असलेल्या मायभूमी सोशल फाउंडेशनच्या वतीने यावर्षी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत एक आगळावेगळा उपक्रम राबवण्यात आला. फाउंडेशनच्या सदस्यांनी एकत्र येत गावाच्या हृदयस्थानी ३१ वटवृक्षांची लागवड करत पर्यावरण रक्षणाचा नवा आदर्श घालून दिला. स्वच्छता, मंदिर परिसर आणि नदी साफसफाईसारख्या उपक्रमांमध्ये सातत्याने अग्रेसर असलेल्या या संस्थेने यावर्षी फक्त ‘शुभेच्छा’ पुरता दिन साजरा न करता प्रत्यक्ष झाडे लावून पर्यावरण संवर्धनाचा ध्यास घेतला. फाउंडेशनतर्फे या ३१ वटवृक्षांच्या संवर्धनाचीही जबाबदारी उचलण्यात आली. लागवड करण्यात आलेल्या सर्व वटवृक्षांना कुंपण जाळ्यांची सोय करण्यात आली असून, ग्रामस्थांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहकार्य केले. काही सहकारी संस्था आणि नागरिकांनी या उपक्रमासाठी आर्थिक मदतही केली. कार्यक्रमात मायभूमी फाउंडेशनचे सर्व सदस्य, गावातील विविध संस्थांचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




केवळ परिसराची स्वच्छता ही जबाबदारी नव्हे, तर भविष्यासाठी हरित वारसा जपणे ही आजची गरज आहे. मायभूमी सामाजिक संस्थेमुळे गेल्या काही वर्षांत परिसरात खूप मोठा बदल जाणवतो आहे. इथले तरुण सामाजिक भान राखून आदर्श घडवत आहेत.
**- सोमनाथ चांदगुडे**

**दैनिक युवक आधार**
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

**daily YUVAK ADHAR** Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# अज्ञात वाहनाच्या धडकेत 40 ते 45 वर्षीय इसमाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

चिंचवण गावाजवळ अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत चाळीस ते पंचेचाळीस वर्षीय ईसमाचा मृत्यू झाला. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. 12 जून रोजी पनवेल कडून कर्नाळा कडे जाणाऱ्या गोवा हायवेच्या लेनवर संग्राम हॉटेल जवळ चिंचवण गावच्या जवळच्या ब्रिज जवळ अपघात झाल्याची माहिती पनवेल पोलिसांना मिळाली. यावेळी अपघातामध्ये 40 ते 45 वर्षीय अनोळखी ईसमाचा मृत्यू झाला.

# मोबाईल खेचून चोरटे पळाले

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

एक्टिवा स्कुटी वरून आलेल्या चोरांनी 47 वर्षीय इसमाकडील दहा हजार रुपयांचा मोबाईल खेचून नेल्या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. नरेश खुटारकर हे नावडे येथे राहत असून 10 जून रोजी ते कामाला जाण्यासाठी सकाळी घरातून निघाले. रिक्षा स्टॅन्ड, नावडे कॉलनी येथे पोहोचले असता मागून आलेल्या काळ्या रंगाच्या एक्टिवा स्कुटी वरील इसमांनी त्यांच्या हातातील मोबाईल खेचून ते पळून गेले.

# पोलीस असल्याचे सांगून केली पैशांची मागणी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: पोलीस असल्याचे सांगून पैशांची मागणी केल्याप्रकरणी प्रदीप बापूराव पाटील (राहणार गौरीपाडा, कल्याण) याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाणे 10 जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. शांताराम मोरे हे सेवानिवृत्त असून ते खांदा कॉलनी येथे राहतात. ते फुल मार्केट पनवेल येथे जाण्यासाठी पनवेल स्थानकात आले. ते सार्वजनिक शौचालय पनवेल बस स्थानक येथे गेले असता लघुशंका केल्यानंतर तेथून बाहेर पडले. त्यावेळी एक इसम त्यांचा पाठलाग करत होता. त्याने त्यांच्या खांद्यावर हात टाकून तुम्ही मुतारी मध्ये काय करत होता मी पोलीस असून तुमच्यावर चोरीचा संशय असल्याचे सांगितले आणि धमकावण्यास सुरुवात केली. त्याच्यामागे आणखी एक इसम आला आणि तो त्याचा साहेब असल्याचे त्या इसमाने सांगितले. यावेळी गुन्ह्यासाठी पन्नास हजार रुपये देऊन बॉण्ड पेपर लिहून घ्यावा लागेल असे सांगितल्याने कमीत कमी 25 हजार रुपये भरावे लागतील असे सांगितले. यावेळी पैसे जवळ नाहीत खांदा कॉलनी येथे घरी गेल्यावर पैसे देतो असे सांगितले. ते खांदा कॉलनी येथे आले असता त्यांनी त्यांच्या मुलाला हकीकत सांगितली. यावेळी त्यातील एक इसम निघून गेला. एकावर संशय आल्याने ते त्या इसमाला घेऊन पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेले. यावेळी प्रदीप बापूराव पाटील असे नाव असल्याचे समजले.

# मारहाण केल्याप्रकरणी चौघांविरोधात गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: शिवीगाळ करून लाथा बुक्क्यांनी आणि दांडक्याने मारहाण केल्याप्रकरणी चौघा विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. इरफान शेख (पापडीचा पाडा) येथे राहत असून बकरी ईद असल्याने सलमान शेख, राजू शेख (राहणार तळोजा) येथे बकऱ्यांची कुर्बानी देऊन त्यातून मिळणारे पैसे वाटून घेण्याचे ठरवले. त्यानुसार त्यांनी सहा बकऱ्यांना कुर्बानी दिली. त्यांना पंधरा हजार रुपये आले. त्यातील दोन हजार रुपये रशीद याला दिले. उरलेले 13 हजार रुपये इरफान, राजू शेख, सलमान शेख यांच्यामध्ये वाटून घेण्याचे ठरवून इरफान याला साडेचार हजार, सलमान याला साडेचार हजार आणि राजू शेख त्याला चार हजार रुपये वाटून घेऊ असे ठरले. यावेळी सलमान याने मी पाच हजार रुपये घेणार असे म्हणाला. त्यामुळे त्याच्याशी वाद झाला. त्यानंतर तो शिवीगाळ करून निघून गेला. दुपारी सलमान शेख इरफानच्या घरी आला आणि जुगारात पैसे हरल्याचे सांगून कुर्बानीच्या वाटणीचे पाच हजार रुपये दे असे सांगितले. त्यावेळी त्याला पाच हजार रुपये दिल्याने तो निघून गेला. त्यानंतर सलमान शेख मित्रांबरोबर उभा असताना आज खूप नुकसान झाले दुसरीकडे बकऱ्या कुर्बानी साठी दिल्या असत्या तर जास्त पैसे मिळाले असते असे बोलला. यावेळी इरफान याने तुझ्या वाटणीचे पैसे दिले असल्याने आता बोलू नको असे सांगितले. यावेळी शिवीगाळ करत सलमान याने भाऊ सलीम, रहमान, अरबाज यांना बोलावून घेतले आणि त्यांनी इरफान याला लाथाबुक्क्यांनी व लाकडी दांडक्याने मारहाण करून डोक्यात दगड मारला. या प्रकरणी सलमान मेहबूब शेख, सलीम मेहबूब शेख, रहमान महबूब शेख, अरबाज महबूब शेख यांचे विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# एटीएम मधून पन्नास हजार रुपये काढून केली फसवणूक

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

एटीएम मधून पैसे काढून देतो असे सांगून दोघांनी पिन नंबर घेतला आणि पन्नास हजार रुपये काढून फसवणूक केल्या प्रकरणी दोन अनोळखी ईसमाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात 10 जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. रजाक मेहंदी हसन सहा हे तळोजा, फेस टू तेथे राहत असून ते एटीएम मध्ये पैसे काढण्यासाठी गेले. यावेळी दोन ईसमानी त्यांच्याकडील एटीएम घेतले. आणि एटीएममध्ये एटीएम टाकून पिन नंबर टाकण्यास सांगितले. त्यावेळी एटीएम मधून पैसे निघाले नाहीत. त्या इसमानी त्यांना एटीएम परत दिले. आणि त्या ठिकाणाहून ते निघून गेले. त्यांना मोबाईलवर पैसे कट झाल्याचे मेसेज आले.

# सणसर मधील पूरग्रस्त वीस दिवसापासून शासकीय मदतीपासून वंचित

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील अवकाळी पावसामुळे सणसर गावात रविवार दि. 25 रोजी मुसळधार पावसाने थैमान घातलं होत.या मुसळधार पावसामुळे पाण्याचा लोंढा सणसर गावातील रस्त्याच्या बाजूला रहात असलेल्या घरात घुसून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते.यामुळे सणसर गावातील मजूर यांचे जनजीवन विस्कळीत झाले असून आज पूर येऊन गेलेला 20 दिवस झाले तरी पूरग्रस्तांना धान्य वाटप व उपमुख्यमंत्री यांनी तातडीची जाहीर केलेली मदत मिळाली नसल्यामुळे पूरग्रस्तांना मदत मिळेल का नाही याबद्दल वेगळीच चर्चा चालू आहे.

इंदापूर तालुक्यातील काम करत असलेल्या प्रशासन यांच्या कामाविषयी चिंता व्यक्त केली जात असून मागील वेळी 2020 मध्ये पण अश्याच प्रकारे पूर येऊन गेला होता त्यामधील सुद्धा अनेक जणांना मदत मिळाली नसल्याचे पूरग्रस्त यांनी सांगितलं आहे. तरी सर्व सामान्य नागरिक यांना मदत मिळेल का नाही याची चिंता वाटायला लागली आहे. तरी या पूरग्रस्तांना लवकरात लवकर मदत मिळावी असे मत सणसर गावचे सरपंच यशवंत नरुटे पाटील व ग्रामसेवक सचिन पवार यांनी तहसीलदार साहेबाना विनंती केली आहे.



# मुरुड येथील कुणबी मराठा समाजाच्या विद्यार्थींचा सत्कार सोहळा संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**लातूर प्रतिनिधी** :- सरस्वती फंक्शन हॉल, येथे कुणबी मराठा समाजातील गुणवंत विद्यार्थींचा सत्काराचा कार्यक्रमा आयोजित करण्यात आला या कार्यक्रमास प्रमुख पाहूने कुणबी मराठा सेनेचे संस्थापक अध्यक्ष विश्वनाथ कोळसुरे सर, लातूर चे माजी महापौर सुरेश तात्या पवार, कुणबी मराठा सेनेचे मराठवाडा अध्यक्ष आशोकराव कातळे,सचिव कुणबी सेना गोविंदराव हालसे,मा शिक्षण विस्तार अधिकारी व्यंकटराव गंगणे सर, मुख्याध्यापक मुक्ताराम शिंदे सर, प्रा. सौदागर भिसे , श्रीमती पद्मीनी हवालदार ( क्षीरसागर ) मॅडम यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम सुरू झाला . तत्पूर्वी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सुरुवात करण्यात



आली तसेच गुजरात येथील विमान दुर्घटनेत मृतृमुखी पडलेल्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. त्या सर्व प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला ,कुणबी मराठा समाजातील दहावी व बारावीत उत्तीर्ण झालेल्या चाळीस विद्यार्थींचा शाल, श्रीफळ, फेटा, पुष्पहार, ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या व्यंकटराव गंगणे सरांनी कार्यक्रमाची रुपरेषा सांगून सर्वजण एकत्र येऊन गेल्या वर्षभरात काय काय कार्यक्रम राबवले याची सविस्तर माहीती दिली. तसेच प्रा सौदागर भिसे सरांनी दहावी बारावी नंतर काय करावे तसेच अभ्यासावर कसा भर द्यावा पालकांनी काय करावे याचे सविस्तर मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या त्यां नंतर आशोकराव कातळे यांनीही मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या अध्यक्षीय भाषणातून विश्वनाथ कोळसुरे सरांनी सविस्तर मार्गदर्शन केले . या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन बालाजी धोत्रे यांनी मांडले व सूत्रसंचालन वैजिनाथ हराळे यांनी केले या कार्यक्रमास दहावी व बारावीतील सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांसह आईवडील उपस्थित होते. तसेच मुरुड शहरातील कुणबी मराठा समाजातील सर्व समाजबांधव उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बाळासाहेब खराडे,विशाल हवालदार, लिंबराज सुर्यवंशी, शाम खराडे, रवी सूर्यवंशी, बलभीम हवालदार,खंडू कोरडे,आमोल क्षीरसागर,कृष्णा घेंबड, पंजाब पवार, नाना क्षीरसागर, संतोष डांगे,लहू कावळे, हणुमंत इंगळे, अक्षय खराडे,बाळराजे इंगळे,भागवत खराडे,विक्रम खराडे, दिपक नरवडे, पवार साहेब, काकासाहेब देशमुख ,अरविंद हवालदार, बालाजी नरवडे, दिलीप गंगणे, चंद्रकांत सुरवसे, बबन खराडे, धनंजय हवालदार, अजय हवालदार यांनी अथक परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केला समाजातील असंख्य महीला , पुरुष व मुल, मुली उपस्थित होते.

# पनवेलमध्ये तोतया पोलिसांचा वृद्धाला लुबाडण्याचा प्रयत्न फसला

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर) :** पोलीस असल्याची बतावणी करून वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला लुबाडण्याच्या प्रयत्नात असलेल्या दुकलीपैकी एका भामट्याला ज्येष्ठ नागरिकाने व त्याच्या मुलाने पकडून पोलिसांच्या स्वाधीन केल्याचा प्रकार पनवेलमध्ये घडला. प्रदीप बापुराव पाटील (40) असे या तोतया पोलिसाचे नाव असून पनवेल शहर पोलिसांनी त्याला अटक केली आहे. तर, पसार झालेल्या त्याच्या साथीदाराचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

शांतराम गोविंद मोरे (71) हे खांदा कॉलनीत राहतात. ते फूल मार्केट येथे जाण्यासाठी पनवेल बस स्थानकावर गेले होते. तेथे एक भामटा त्यांचा पाठलाग करत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. दरम्यान, या भामट्याने पोलीस असल्याचे सांगत शांताराम मोरे यांना रस्त्यात अडवले. त्यानंतर त्याने मोरे यांच्यावर चोरीचा संशय घेत त्यांना दमात घेण्याचा प्रयत्न करत असताना ठरल्या प्रमाणे तेथे त्याचा दुसरा साथीदार आल्यानंतर त्याने देखील पोलिसांचा मोठा साहेब असल्याचे सांगून मोरे यांच्याकडील ओळखपत्रे त्यांच्याकडे घेतली.

त्यानंतर या दोघांनी मोरे यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची धमकी देऊन त्यांच्याकडे 50 हजार रुपयांची मागणी करून बाँड पेपर लिहून द्यावे लागेल, असे बजावले. मात्र, मोरे यांनी त्यांच्याकडे 50 हजार रुपये नसल्याचे सांगितले असता दोघा भामट्यांनी 25 हजार रुपये देण्यासाठी त्यांच्यावर दबाव टाकला. यावेळी मोरे यांनी युक्ती लढवत त्यांना रिक्षामधून खांदा कॉनीतील घराजवळ नेले. तेथे पोहोचल्यावर मोरे यांनी त्याचा मुलगा संकत याला बोलावून घेतले. हे या दोघांच्या लक्षात येताच त्यांच्यातील एका भामट्याने तेथून पळ काढला. मात्र, दुसरा भामटा त्यांच्या हाती लागला. त्याला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव प्रदीप बापुराव पाटील असल्याचे सांगितले. मात्र, त्याची अधिक चौकशी केली असता तो उडवा उडवीची उत्तरे देऊ लागला. त्यावर तो पोलीस नसल्याचे मोरे यांच्या लक्षात आल्यानंतर संकेत आणि शांताराम मोरे यांनी त्याला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले.

# मुंबई वंदे भारत एक्सप्रेस आता थेट नांदेडपर्यंत येणार

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड - मुंबई -** जालना वंदे भारत एक्सप्रेसचा विस्तार आता हजुर साहिब नांदेडपर्यंत करण्यात आला आहे.रेल्वे बोर्डाने प्रसिध्दीपत्रकाद्वारे याची माहिती दिली आहे. गाडी क्र.20705 नांदेडहून मुंबईकडे बुधवार वगळता दररोज सकाळी 5 वाजता रवाना होईल.ती परभणी,जालना, संभाजीनगर,अंकाई,मनमाड,नासिक, कल्याण,ठाणे मार्गे दुपारी 2.25 ला सीएसटी मुंबई ला पोहोचेल. गाडी क्र.20706 मुंबईहून नांदेडकडे गुरुवार वगळता दररोज दुपारी 1.10 वाजता निघेल आणि त्याच मार्गाने रात्री 10.50 ला नांदेडला पोहोचेल.या ट्रेनमध्ये 8 एसी चेअर कार कोच असतील.

मागील वर्षभर मी मुंबई - जालना वंदे भारत एक्सप्रेस नांदेडपर्यंत वाढवण्याची मागणी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे सातत्याने लावून धरली होती. पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी,रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव,रेल्वे राज्यमंत्री रवनीतसिंह बिट्टू यांचे मनःपूर्वक आभार
खा.डॉ.अजितजी गोपछडे राज्यसभा खासदार यांच्या प्रयत्नाला यश



# महिला-मुली यांच्या सुरक्षा अनुषंगाने महिलादक्षता समितीच्या बैठकीत वपोनि गजानन घाडगे यांनी केले मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, वार्ताहर**

पनवेल तालुका पोलीस ठाण्यामध्ये महिला दक्षता समिती सदस्यांची आज बैठक पार पडून यावेळी वपोनि गजानन घाडगे यांनी विविध विषयाच्या सुरक्षेच्या अनुषंगाने उपस्थित समिती सदस्यांना मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना वपोनि गजानन घाडगे यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील अडीअडचणी, महिला - मुली यांची सुरक्षा अनुषंगाने योग्य त्या सूचना व उपाययोजना, सायबर सुरक्षा व गुन्हे प्रतिबंध, व्यसन मुक्ती व अंमली पदार्थ प्रतिबंध, आर्थिक फसवणूक व प्रतिबंधक उपाय. जेष्ठ नागरिक सुरक्षा व काळजी तसेच सर्व नागरिकांना नवी मुंबई पोलीस व्हाट्सअप चॅनल फॉलो करण्यास सांगितले. त्याचप्रमाणे नागरिकांचे पोलिस मदतीसाठी डायल 112 व साइबर फ्रॉड हेल्पलाईन 1930 व कोस्टल हेल्पलाइन नंबर- 1093 या क्रमांकाची माहिती देऊन त्याचा प्रसार नागरिकामध्ये करावा याबाबत सांगण्यात आले आहे. सदर बैठकीस 06 महिला दक्षता समिती सदस्य, पो नि, कांबळे, मसपोनि अर्चना कुदळे असे उपस्थित होते.




# सिल्लोड तालुक्यात विज कोसळून दोन सख्ख्या भावांसह चार जनावरांचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**




**सिल्लोड :-** तालुक्यात शनिवारी दुपारी विजेच्या कडकडाटासह झालेल्या मुसळधार पावसाने मोठे संकट ओढवले. वीज पडून दोन सख्या भावांसह चार जनावरेही दगावली. या घटनेने सिल्लोड तालुक्यावर शोककळा पसरली. मिळालेल्या माहितीनुसार शनिवारी दुपारी २ वाजेच्या सुमारास तालुक्यात विजांच्या प्रचंड कडकडाटासह जोरदार पावसाला सुरुवात झाली. या दरम्यान सारोळा शिवारातील गट क्रमांक २९४ मध्ये वीज कोसळून यश राजू काकडे (वय १४) आणि रोहित राजू काकडे ( वय २१) या दोन सख्ख्या भावांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना घडली तेव्हा ते शेतात काम करत असल्याची प्राथमिक माहिती आहे.

*म्हैस आणि तीन वासरेही दगावली* या नैसर्गिक आपत्तीचा फटका केवळ मानवी जीवनालाच नाही तर जनावरांनाही बसला. मांडणा येथील गट क्रमांक २९५ मध्ये वीज पडून ज्ञानेश्वर माणिकराव लोखंडे यांची तीन वासरे दगावली तर अन्वी शिवारातील गट क्रमांक १३९ मध्ये नारायण सांडू बांबर्डे यांची एक म्हैस देखील वीज पडून मृत्युमुखी पडली. प्रशासनाकडून तातडीने पंचनामे करण्याचे काम सुरू करण्यात आले असून, मृतांच्या कुटुंबीयांना शासनाकडून योग्य ती मदत देण्याची मागणी जोर धरत आहे.

# "योग विथ आ. प्रशांत ठाकूर" प्रबळगड माची येथे जागतिक योग दिनाचे खास आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)**

भारतीय जनता युवा मोर्चा पनवेलच्या वतीने यंदाही जागतिक योग दिनाचे औचित्य साधून "योग विथ आमदार प्रशांत ठाकूर" या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शनिवार दिनांक २१ जून रोजी सकाळी ६ वाजता पनवेलजवळील प्रबळगड माची या निसर्गरम्य आणि ऐतिहासिक स्थळी होणार आहे. दरवर्षी प्रमाणे यंदाही योगप्रेमींना एकत्र आणून शारीरिक व मानसिक स्वास्थ्याचा संदेश देण्यासाठी हाच उपक्रम राबवला जात आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकाराने सुरू झालेला हा उपक्रम आता एक परंपरा बनला असून, आरोग्य, युवक सशक्तीकरण आणि सांस्कृतिक जतन याला वाहिलेला आहे. प्रबळगड माची, सह्याद्रीच्या कुशीत वसलेले, निसर्गाच्या सान्निध्यातील एक शांत आणि




ऊर्जादायी जागा आहे. येथे योगाभ्यास करताना शरीर आणि मन दोघांनाही नवचैतन्य मिळते. ऐतिहासिक ठिकाणी योगसाधना करताना निसर्गाशी नाते जपण्याची, आणि आत्मिक शांतता अनुभवण्याची संधी मिळते. या उपक्रमात दरवर्षी शेकडो युवक, महिला, स्थानिक नागरिक, तसेच विविध संघटनांचे प्रतिनिधी सहभागी होत असतात. विविध योगासने, श्वसन तंत्रे आणि ध्यानधारणा यांचे सत्र यावेळी योजित करण्यात आले असून या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे स्वतः आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती आणि सहभाग आहे, जे सदैव युवा वर्गासाठी प्रेरणास्त्रोत राहिले आहेत. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ऑनलाईन नोंदणी फॉर्म उपलब्ध करण्यात आलेला आहे. सहभागी होण्यासाठी HTTPS://DOCS.GOOGLE.COM/FORMS/D/E/1FAIPQLSCULCMQ-BBUQHJI5GULPMRJG2UWY75XN4BKUPX671IB1ENERG/VIEWFORM या लिंकवर क्लिक करून नाव नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन युवा मोर्चाच्यावतीने करण्यात आले आहे.

# कु.चारु तारक मेहता ही वैमानिक पदावर रुजू झाल्याने तिचे करण्यात आले अभिनंदन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर) :**



यशोधन सोसायटी मधील एक अत्यन्त हुशार विद्यार्थिनी कु.चारू तारक मेहता हिला तिच्या उज्वल यशाबद्दल अभिनंदन करण्याकरिता मा.नगरसेवक मनोज भुजबळ तसेच सोसायटील पदाधिकारी व ज्येष्ठ बंधू भगिनी उपस्थित होते. डॉ. तारक मेहता आणि डॉ. धनश्री मेहता यांची कन्या असलेली चारू ही तिच्या पालकांप्रमाणेच अत्यन्त हुशार. आई वडील जरी डॉक्टर असले, तरी पायलट होणं हेच चारूचं स्वप्न होतं, आणि तिच्या ह्या स्वप्नाला पाठिंबा देण्याचं धाडस सौ व डॉ. मेहता यांनी दाखवलं. चारूनेही त्यांना अभिमान वाटेल असाच अभ्यास केला. चारू डी. ए. व्ही. पब्लिक स्कूल च्या सीबीएसई बोर्डातून दहावीची परीक्षा 98.0% गुण मिळवून पास झाली, त्यानंतर बारावीच्या विज्ञान शाखेच्या परीक्षेत 93% गुण मिळवले, आता तिचा प्रवास एनडीएच्या दिशेने सुरु झाला. एनडीएच्या परीक्षेत ती मेरिट होल्डर झाली. एसएसबी सर्विस सिलेक्शन बोर्ड ऑफ इंडिया चा तिचा अत्यंत कठीण असा इंटरव्ह्यू एएफएसबी एरफोर्स सिलेक्शन बोर्ड डेहराडून येथे तब्बल सात दिवस झाला. हा इंटरव्ह्यू यशस्वीरित्या पर पाडल्यानंतर तिला पुढील प्रशिक्षणासाठी शिफारस मिळाली. पुढे नवी दिल्ली येथील एमएफसीएमई तर्फे तिला मेडिकल फिटनेस चे क्लिअरन्स मिळाले, आणि आता दि. 21/06/2025 रोजी ती एनडीए खडकवासला येथे पुढील प्रशिक्षणासाठी जाणार आहे. या पुढील तिचे प्रशिक्षण तीन वर्ष पुणे येथे, तर एक वर्ष हैदराबाद येथे झाल्यावर ती वैमानिक पदावर रुजू होईल.

# कळंबोली मंडल अध्यक्ष अमर पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत आरोग्य शिबीर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

भारतीय जनता पार्टीचे कळंबोली मंडल अध्यक्ष तसेच पनवेल महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती सभापती अमर अरुण पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवार दिनांक १६ जून रोजी कळंबोलीत मोफत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात सिटी हॉस्पिटल, आशा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल व सुश्रुत हॉस्पिटल यांचा सहभाग आहे. या शिबिराचे उदघाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. कळंबोलीतील सेक्टर ०३ मधील सिटी हॉस्पिटल येथील रुग्णालयात जनरल चेकअप, कान, नाक, घसा, डोळे व दंतरोग तपासणी, सेक्टर १६ मधील आशा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये जनरल



चेकअप, कान, नाक, घसा, रक्तदाब, रक्त तपासणी, तसेच गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग तपासणी, तर सुश्रुत हॉस्पिटल येथे जनरल चेकअप, कान, नाक, घसा, आणि हाडांची तपासणी आदी तपासण्या करण्याबरोबरच औषधे मोफत दिली जाणार आहेत. या उपक्रमाचा कळंबोली व परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कळंबोली भाजप मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

# रिसोड मुख्याधिकाऱ्यांनी केली जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

मुख्याधिकारी तथा प्रशासक सतीश शेवदा यांनी येथील जल शुद्धीकरण केंद्राची पाहणी करून जलशुद्धीकरण केंद्रावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या. मागील काही दिवसापासून रिसोड शहराला गढूळ पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाले आहेत मे महिन्याच्या शेवटच्या पंधरवडात पडलेल्या अवकाळी पावसामुळे आडोळ पाणी प्रकल्पाचे पाणी पातळी थोड्या प्रमाणात वाढली



आहे. या अवकाळी पावसामुळे धरणातील पाणी गढूळ झाले आहे. परिणामी मागील आठ ते दहा दिवसापासून रिसोड शहराला गढूळ पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे शहराला गढूळ पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने काल दिनांक 11.6.2025. रोजी मुख्याधिकारी तथा प्रशासक सतीश शेवदा. यांनी जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी केली. यावेळी त्यांनी संपूर्ण जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी करून तातडीने पाणीपुरवठा गढूळ का होत आहे तसेच याबाबत उपाययोजना करण्याचे आदेश दिले. जलशुद्धीकरण केंद्रावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या. व रिसोड शहरातील होणाऱ्या पाणीपुरवठ्यामुळे कुठल्याही नागरिकांना आरोग्य हानी पोहोचू नये. त्यासाठी लवकरच पूर्वीप्रमाणे पाणीपुरवठा होईल.

गेल्या काही दिवसापासून आडोळ जलशुद्धीकरण प्रकल्पाची पाणी पातळी खालवल्यामुळे व मध्यंतरी झालेल्या पावसामुळे पाणी गढूळ होत आहे. त्यामुळे येणारे पाणी थोड्याफार प्रमाणात गढूळ आले होते. पण मी स्वतः जलशुद्धीकरण केंद्रावर जाऊन तसेच आडोळ पाणी प्रकल्पावर जाऊन याबाबतची सखोल चौकशी पाहणी केली आहे. लवकरच पूर्वीप्रमाणे पाणीपुरवठा होईल. सतीश शेवदा. मुख्याधिकारी तथा प्रशासक नगरपरिषद रिसोड.

# सामाजिक कार्यकर्ते दिपक नेवसे यांना पितृशोक

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**



सणसर येथील युवा उदयोजक दिपक नेवसे यांचे वडील कै.श्री.दशरथ संभाजी नेवसे उर्फ कॅप्टन वय- 75, रा., सणसर यांचे शनिवार दिनांक 14/06/2025 रोजी अल्पशा आजाराने अकस्मित दुःखद निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी तीन मुले एक मुलगी असा परिवार आहे.

श्री दशरथ संभाजी नेवसे हे हॉलीबॉल खेळामध्ये उत्कृष्ट खेळाडू म्हणून परिचित होते. त्यांना परिसरात कॅप्टन या टोपण नावाने ओळखले जायचे.शेतीतील तरकारीमुळे सर्वाना त्यांचा परिचय जवळचा होता.

# सरकारी जंगलातील शिसव तोडीचा पर्दाफाश; चौलच्या चार जणांवर गुन्हा दाखल, वनविभागाची कारवाई

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

दि. १० जून २०२५ रोजी रात्री, नागांव फॉरेस्ट परिक्षेत्रातील अधिकाऱ्यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे, चौल भवाळे येथील श्री दत्तमंदिर परिसरातील शासकीय राखीव जंगलातून बेकायदेशीररित्या शिसव प्रजातीचे वृक्ष तोडले जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला.वनविभागाने क्षणाचाही विलंब न करता मोहिम राबवत चौघांना ताब्यात घेत कारवाईचे गाजर उडवले. ताब्यात घेतल्यानंतर या इसमांनी गुन्ह्याची कबुली दिली असून शासकीय मालमत्तेची लूट होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**ताब्यात घेतलेले आरोपी:**

1. मनोज सुभाष खारकर (रा. चौल)
2. राकेश किसन भोईर (रा. चौल)
3. अजय अनंत शेळके (रा. सराई)
4. माधव मुकुंद बापट (रा. चौल)




वनविभागाने घटनास्थळी आणि संशयित आरोपीच्या घरामागील जागेतून एकूण १४ नग शिसव लाकूड तसेच वाहतुकीसाठी



वापरलेले TATA ACE (MH06 AG 8853) वाहन जप्त केले आहे. सदर प्रकरणात भारतीय वन अधिनियम 1927 नुसार चौल C-4/25 असा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मनोज खारकर याचा मूळ व्यवसाय माड तोडण्याचा असून तो याआधीही खासगी मालकीच्या जमिनीतून परवानगीशिवाय झाडे तोडण्याचा प्रकार करत होता. राकेश भोईर हा सरकारी व खासगी जमिनीवरील झाडे हुडकून त्याची माहिती खारकरला पुरवत असे. हा अवैध माल अजय शेळके याच्या मालकीच्या वाहनाने वाहतूक करण्यात येत होता.

या टोळीचा जंगललुटीचा गुन्हेगारी इतिहास वनविभागाच्या रडारवर असल्याने, हा धडाकेबाज सापळा आखण्यात आला. माधव बापट याने आपल्या घरातील फर्निचरसाठी शिसव लाकडाची मागणी खारकरकडे केली होती. त्यानुसार त्याला बेकायदेशीररित्या कापलेले काही लाकूड पुरवण्यात आले. सदर कारवाईत मा. उपवनसंरक्षक राहुल पाटील, सहाय्यक वनसंरक्षक भाऊसाहेब जवरे व वनपरिक्षेत्र अधिकारी नरेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक अधिकारी मौलेश तायडे, उदय हटवार, विजय पाटील, प्रभाकर भोईर, दत्ता कोळेकर आणि वॉचमन स्टाफ यांचा सक्रिय सहभाग होता.वनसंपत्तीची ही पद्धतशीर लूट व जंगलातील शिसव वृक्षांची अवैध कत्तल हे गंभीर पर्यावरणीय संकट असून याविरोधात कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. सध्या चौकशी सुरु असून पुढील कारवाईसाठी वनविभाग सज्ज आहे.

## पिंपळदरीत दोन सख्या भावावर कोसळली वीज एकाचा मृत्यू, तर एक गंभीर जखमी पिंपळदरी परिसरात होत आहे हळहळ व्यक्त

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

सिल्लोड तालुक्यातील पिंपळदरी येथे विजेच्या अचानक कोसळलेल्या प्रकोपात एकाचा मृत्यू झाला असून एकजण गंभीर जखमी झाला आहे ही घटना दिनांक: १४/०६/२०२५ रोजी दुपारी साडेतीन वाजता घडली आहे. ज्यांच्यावर वीज कोसळली ते दोघेही सख्खे भाऊ असून त्यामध्ये शिवाजी सतीश गव्हाणे (वय ३०) याचा जागीच मृत्यू झाला तर जीवन सतीश गव्हाणे (वय २१) हा गंभीर जखमी झाला. हे दोघेही सख्खे भाऊ असून ही अत्यंत दुर्दैवी घटना घडल्यामुळे पिंपळदरी परिसरात सर्व स्तरातून हळहळ व्यक्त होत आहे सविस्तर माहिती अशी की शिवाजी व जीवन हे दोघे सख्खे भाऊ शेतात काम करत असताना अचानक आकाशात वीज चमकली आणि काही क्षणातच त्यांच्यावर कोसळली. या घटनेत शिवाजी यांचा जागीच मृत्यू झाला, तर जीवन गंभीररीत्या भाजल्याने त्याला तातडीने सिल्लोड येथील घाटी रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले. त्यांची प्रकृती सुद्धा चिंताजनक असल्याची माहिती आहे. या हृदयद्रावक घटनेने संपूर्ण पिंपळदरी गावात शोककळा पसरली आहे. सख्खे भावांवर एकाच वेळी कोसळलेले हे संकट गावकऱ्यांच्या काळजाला चटका लावणारे ठरले आहे.

या घटनेची नोंद अजिंठा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. पुढील तपास साय पोलीस निरीक्षक अमोल ढाकणे हे करीत आहे.





## तळा तालुक्यामध्ये आयुष्यमान भारत कार्ड शिबिराचे आयोजन.



**दैनिक युवक आधार**
**तळा प्रतिनिधी नितीन लोखंडे.**

**तळा :** मा. जिल्हाधिकारी रायगड - अलिबाग यांनी दिलेल्या निर्देशानुसार नागरिकांचे आयुष्यमान कार्ड तयार करण्यासाठी तळा तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी श्रीमती. स्वाती पाटील यांनी तालुक्यामध्ये विविध ठिकाणी आयुष्मान भारत कार्ड शिबिराचे आयोजन केलेले आहे. आयुष्यमान भारत योजना ही केंद्र सरकारची योजना असून या योजनेला प्रधानमंत्री जन आरोग्य योजना असे सुद्धा संबोधले जाते. या योजनेचा उद्देश आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांना मोफत आरोग्य सेवा पुरवणे हा आहे. या योजनेअंतर्गत नोंदणीकृत गोरगरीब, आर्थिक कमकुवत नागरिकांना आजारपणामध्ये पाच लाखापर्यंत कॅशलेस सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा फुले जन आरोग्य योजना या योजनांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांकडे आयुष्यमान कार्ड असणे आवश्यक्य आहे. या योजनेपासून कोणीही वंचित राहू नये यासाठी बीपीएल एपीएल कार्डधारकांनी तसेच आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांनी आयुष्यमान भारत कार्ड काढण्यासाठी नागरिकांनी अधिकाधिक इ-केवायसी करून आयुष्यमान भारत कार्ड बनवण्यासाठी शिबिराचा लाभ घ्यावा असे आव्हाहन तळा तहसीलदार श्रीमती. स्वाती पाटील यांच्याकडून करण्यात आले आहे.

## रात्रभर जीव धोक्यात घालून वीज कर्मचाऱ्यांचा विजय!

### ग्राहक सेवेला दिले सर्वोच्च प्राधान्य

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

**विंचूर** : दि.१३ जून रोजी संध्याकाळी साडेचारच्या सुमारास निफाड तालुक्यावर अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. गडगडाट, विजांचा कडकडाट, आणि वाऱ्याच्या तडाख्यात पिंपळस, सुकेणे व कारखाना परिसरातील वीजेचे खांब आणि तारा तुटून पडल्या. परिणामी पिंपळस, नैताळे, नांदूरमध्यमेश्वर आणि जळगाव निघोज या चार उपकेंद्रांचा वीज पुरवठा पूर्णतः खंडित झाला.

या आपत्कालीन परिस्थितीत ३३ के.व्ही. पिंपळस, जळगाव व नैताळे लाईनवरील पिन इन्सुलेटर फुटल्याने विजवाहक तारा जमिनीवर आल्या. अशा धोकादायक परिस्थितीत देखील महावितरणच्या निफाड विभागातील कर्मचाऱ्यांनी जीव धोक्यात घालून अविरत प्रयत्न करत रात्री ३:२० वाजता वीज पुरवठा सुरळीत केला.

भर पावसात, अंधारात, कोणतीही तक्रार न करता – ग्राहकांची सेवा हेच ध्येय मानून केलेले हे कार्य समाजासाठी प्रेरणादायी ठरले आहे.



**कौतुकास पात्र:**
ग्राहकसेवेसाठी रात्रभर झगडणाऱ्या महावितरणच्या या सर्व कर्मचाऱ्यांचे समाजातून खुलेपणाने कौतुक होत आहे. ही केवळ सेवा नाही, तर कर्तव्याची तीव्र जाणिव आणि धाडसाची अमोल उदाहरणे आहेत.

या धाडसी मोहिमेत नवीनच रुजू झालेले उपकार्यकारी अभियंता सुनील राऊत स्वतः घटनास्थळी उपस्थित राहून मार्गदर्शन करत होते. त्यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक अभियंते हेमंत शिनकर, जितेंद्र बोरसे, साकेत पाटील, स्वप्नील सवई, राहुल भगत, तसेच जनमित्र हांडगे, कुमावत, सांगळे, जगदाळे, प्रवीण व विजय पवार, शिंदे, अकिब, दिघे, सुनील, साहिल आणि इतर कर्मचारी संपूर्ण रात्र कार्यरत होते. विद्युत कंत्राटदार अरविंद मोरे, अभिजीत सानप आणि संतोष भोसले यांची मोलाची मदत या मोहिमेस लाभली. या मोहिमेचे यश नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता सुंदरजी लटपटे, नाशिक मंडळाचे अधीक्षक अभियंता राजेश थुल आणि चांदवड विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. केशव काळूमाळी यांच्या मार्गदर्शनामुळे शक्य झाले.

## मीनल म्हात्रे यांना सरपंच पदावरून काढण्याचे विभागीय आयुक्तांचे आदेश, सदस्य पद राहणार कायम

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

कोळखे ग्रामपंचायतच्या सरपंच मीनल रोहन म्हात्रे यांना सरपंच पदावरून काढून टाकण्याचा निर्णय कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिला असून त्यांचे सदस्य पद कायम ठेवण्यात आले आहे. कोकण आयुक्त यांच्याकडे कोळखे गावच्या वेशीवर प्रवेशद्वारावर बांधण्यासाठी ग्रामपंचायतीने ठराव करून सरपंच यांनी पदाचा गैरवापर केल्याने त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यासाठी राजेंद्र हरिश्चंद्र पाटील (कोळखे) यांनी तक्रार केली होती. त्यानुसार तक्रारदार आणि गैर अर्जदार यांनी आपले म्हणणे मांडले. यावेळी चेंबर साफ करताना रोखीने पैसे अदा करून महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा संहिता 2011 मधील नियम 24 चा भंग करून प्रशासकीय अनियमित्ता केल्याचे दिसून आले. कमानीचे बांधकाम करण्यात आलेल्या जागेबाबत ग्रामपंचायतीने खातरजमा न करता ग्रामपंचायत कार्यक्षेत्राबाहेरील जागेवर कमान बांधकामाबाबत ठराव व ना हरकत दाखला देऊन प्रशासकीय अनियमितता केल्याचे स्पष्ट होत आहे. ग्रामपंचायतीने महावितरण कार्यालयाची परवानगी न घेता विद्युत पोलवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवून आणि प्रशासकीय अनियमितता केल्याचे दिसून आले. तसेच सरपंच यांनी कमानीचे निर्लेखन करताना महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता नियम 75 चा अवलंब केलेला दिसून आला नाही. पंचायतीने केलेला ठराव अमलात आणणे ही जबाबदारी प्रचलित कायद्यानुसार सरपंच यांची असताना ती जबाबदारी पार न पाडता सोपवलेली कर्तव्य पार पाडताना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमनुसार कर्तव्यात कसूर केल्याचे निदर्शनास आले. यावरून कोकण आयुक्त यांनी कोळखे ग्रामपंचायत सरपंच मीनल रोहन म्हात्रे यांना सरपंच पदावरून काढून टाकण्याचा आदेश दिला आहे. त्यांचे सदस्य पद कायम ठेवण्यात आले आहे.

## 42 वर्षीय इसम बेपत्ता

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**



नेरे, महालक्ष्मी नगर येथील उमेश लक्ष्मण कटके (४२) हा घरातून कोणाला काही न सांगता निघून गेल्याने तो हरवला असल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली. तो अंगाने मध्यम असून त्याचा चेहरा गोरा आणि उभट आहे. त्याच्या डाव्या डोळ्याच्या बाजूस दोन तीळ असून अंगात ग्रे कलरचा टी शर्ट आणि काळ्या रंगाचा बर्मुडा परिधान केला आहे. त्याला मराठी, हिंदी, इंग्रजी भाषा येते. या इसमाबद्दल अधिक माहिती असल्यास पोलीस नाईक प्रदीप पोपेटे यांच्याशी संपर्क साधावा.

# मेडशी येथे ग्राहक प्रबोधन सभेचे आयोजन. !

## खातेदार व कास्तकार यांच्या हिताचा विचार करणारी बँक - दिलीपराव जाधव

**दैनिक युवक आधार**
**वाशीम जिल्हा प्रतिनिधी**
**करण धोंगडे**

**मेडशी -** येथे दि. १३ जुन शुक्रवार रोजी दि अकोला - वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे शाखा मेडशीचे वतीने ग्राहक प्रबोधन सभा संपन्न झाली. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षा निमित्त मेडशी येथे दि. 13 जुन 2025 रोजी ग्राहक प्रबोधन सभेचे आयोजन केले गेले होते. सहकारातून समृद्धी निर्माण करणे व सहकाराला बळकटी प्रदान करण्याच्या दृष्टीने सदर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. दिलीपराव जाधव संचालक, दि. अकोला वाशीम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, तर प्रमुख उपस्थिती शे. गणीभाई शे. चाँदभाई बागवान होते. यावेळी मंचावर प्रमुख उपस्थिती म्हणून शे. जमीर शे. गणीभाई सरपंच मेडशी, श्री ज्ञानदेवराव साठे




अध्यक्ष तंटामुक्ती मेडशी, शौकत पठाण माजी तंटामुक्ती अध्यक्ष, श्री. पुंडलिकराव पांडे उपाध्यक्ष सेवा सहकारी सोसायटी मेडशी, श्री गजाननराव शिंदे संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती मालेगाव, श्री झनकराव नप्ते अध्यक्ष सेवा सहकारी सोसायटी भौरद, श्री प्रदीप तायडे माजी पंचायत समिती सदस्य, सौ. प्रियाताई पाठक अध्यक्ष नवदुर्गा बहुउद्देशीय महिला बचत गट, श्री आत्मारामजी धंदरे माजी जिल्हा परिषद सदस्य, श्री प्रकाशराव सानप अध्यक्ष सेवा सह सोसायटी ब्राह्मणवाडा, श्री पुंजाजीराव वाघ अध्यक्ष सेवा सोसा पांगराबंदी, श्री शिवरामजी शेंडे सदस्य सेवा सहकारी सोसायटी मेडशी यांची उपस्थिती होती. श्री नारायणरावजी घुगे अध्यक्ष ग्रामसेवक संघटना यांचा मा. मुख्यमंत्री यांचे हस्ते राज्यस्तरीय आदर्श ग्रामसेवक म्हणून पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल, या कार्यक्रमात त्याचाही श्री दिलीप रावजी जाधव संचालक यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच यावेळी बँकेचे ठेवीदार तथा खातेदार यांचे सहित सलग्नित गावातील सेवा सहकारी सोसायट्यांचे अध्यक्ष, सदस्य उपस्थित होते. या कार्यक्रमास महिलांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँकेचे उपमुख्याधिकारी श्री. के. जी. बिसकुंदे (तालुका प्रमुख मालेगाव) यांनी केले. बँकेचे पीक कर्ज, सोलर कर्ज, विहीर बांधकाम कर्ज, पाईपलाइन कर्ज आदी सुविधेंचा ग्राहकांनी लाभ घ्यावा असे आवाहन बँकेच्या वतीने त्यांनी केले. त्यांनी बँकेचे विविध ठेवी व कर्जांच्या योजनेबद्दल माहिती दिली. त्यानंतर कु. आर. डी. ठाकरे पालक शाखाधिकारी मालेगाव यांनी बँकेच्या विविध डिजिटल सुविधेंबद्दल माहिती दिली. जसे एटीएम, एन इ एफ टी, आर टी जी एस व एटीएम हाताळताना घ्यावयाच्या काळजी बद्दल माहिती दिली. त्यानंतर शे. गणीभाई शे.चॉंदभाई बागवान, श्री आत्मारामजी धंदरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ग्राहक प्रबोधन सभेस भागधारक, बँकेचे ग्राहक, व्यापारी, कर्जदार सभासद, ठेवीदार, शेतकरी आदिंची शेकडोच्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी सर्वांना अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री जितेंद्र खंडारे शाखाधिकारी मेडशी यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री प्रवीण वराडे बँकिंग ऑफिसर ग्रेड 1 यांनी केले. यावेळी शाखेचे सर्व कर्मचारी तसेच सर्व निरीक्षक व गटसचिव उपस्थित होते.

## भारतीय कृषी पीक विमा कंपनीच्या वतीने मंगरूळपीर तालुक्यात विसावा बेंच चे उद्घाटन.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

पिक विमा योजनेसाठी वाशिम जिल्ह्यात भारतीय कृषी पीक विमा कंपनी कार्यरत असून कंपनीच्या वतीने तालुका कृषी अधिकारी कार्यालय येथे शेतकऱ्यांच्या सोयीसाठी विसावा बेंच लावण्यात आले. या विसावा बेंच चे उद्घाटन मंगरूळपीर तालुका कृषी अधिकारी. श्री. सचिन कांबळे सर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी कृषी कार्यालयातील कर्मचारी वृंद उपस्थित होते. तालुका कृषी कार्यालया सोबतच तहसील कार्यालय मंगरूळपीर आणि पंचायत समिती कार्यालय मंगरूळपीर येथे सुद्धा विसावा बेंच लावण्यात आले आहे. यावेळी तालुका प्रतिनिधी पवन जायभाय. अनंता अंभोरे चंद्रशेखर राठोड उपस्थित होते. या विसावा बेंचमुळे कार्यालयात येणाऱ्या शेतकऱ्यांना थोडा वेळ विसावा घेण्यासाठी एक उपयुक्त व्यवस्था उपलब्ध झाली आहे. या सोबतच पिक विमा योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी नैसर्गिक आपत्ती पासून आपल्या पिकाचे संरक्षण करावे असा संदेशही या बेंचद्वारे प्रसारित करण्यात आला आहे. शासनाच्या मार्गदर्शनाखाली आणि भारतीय कृषी पीक विमा कंपनीच्या सहकार्याने शेतकऱ्यांच्या हितासाठी असे उपक्रम राबवली जात असून त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पिक विमा जागृतीचा प्रसार होऊन मदत होईल.



## नांदूरमधमेश्वर बस सफारीला उत्स्फूर्त प्रतिसाद

### नाशिकहून दररोज सेवा सुरू; पक्षीप्रेमी आणि पर्यटकांमध्ये उत्साहाची लाट




**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

**विंचूर :-** निसर्गप्रेमी आणि पक्षी निरीक्षकांसाठी आनंदाची बातमी आहे. नाशिक येथून नांदूरमधमेश्वर अभयारण्यापर्यंत दररोज बस सफारी सेवा सुरू करण्यात आली असून, या उपक्रमाला पहिल्याच दिवशी उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दिनांक १४ जून रोजी या उपक्रमाचे उद्घाटन नाशिक विभागीय आयुक्त प्रविण गेडाम यांच्या हस्ते पार पडले.

या उद्घाटन सोहळ्याला मुख्य वनसंरक्षक (नाशिक प्रा.) मल्लीकार्जुन जी., नाशिक वन्यजीव विभागाचे उपवनसंरक्षक गजेंद्र हिरे, जिल्हा परिषद कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, उपवनसंरक्षक (पूर्व) उमेश वावरे, तसेच सामाजिक वनीकरण विभागीय वन अधिकारी गणेश रणदिवे उपस्थित होते. ही बस सफारी दररोज सकाळी ७ वाजता नाशिक येथील अरण्य संकुल, त्र्यंबक नाका, जुना मुंबई-आग्रा रोड येथून सुरू होते. पर्यटकांना नांदूरमधमेश्वर अभयारण्यात फिरवून पुन्हा दुपारी १२ वाजेपर्यंत नाशिकमध्ये परत आणले जाते. या सफारीत प्रवेश फी, तज्ज्ञ गाईड, दुर्बिणीचा वापर आणि अल्पोपहार यांचा समावेश असून, हे सर्व माफक दरात उपलब्ध आहे. एकावेळी फक्त २० पर्यटकांनाच प्रवेश मिळणार असल्याने इच्छुकांनी वेळेत बुकिंग करून नाशिक वन्यजीव विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या पहिल्या सफारीसाठी नाशिकमधील नामवंत पक्षी निरीक्षक व पर्यावरणप्रेमींनी उत्साहाने उपस्थिती लावली. प्रा. आनंद बोरा, अनंत सरोदे, सतिश गोगटे, अनिल माळी यांच्यासह अनेकांनी निसर्गाचा मनमुराद आनंद घेतला. नांदूरमधमेश्वर अभयारण्याचे सहाय्यक वनसंरक्षक व वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी नागरिकांना आवाहन केले की, "ही सेवा पर्यावरणसंवेदनशील पर्यटनाला चालना देणारी आहे. नागरिकांनी निसर्गाच्या सान्निध्यात रमण्यासाठी या अनोख्या संधीचा अवश्य लाभ घ्यावा."

## राज्यराणी एक्स्प्रेस गाडीचा विस्तार किनवट पर्यंत करा

### शिवसेना युवा तालुका प्रमुख अजय कदम यांनी मागणी केली.

**दैनिक युवक आधार**
**किनवट प्रतिनिधी**
**विशाल भालेराव**

किनवट नांदेड येथून सुटणाऱ्या अनेक एक्स्प्रेस गांड्यांचा विस्तार आदीलाबाद पर्यंत करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे आता मुंबई - नांदेड या राज्याराणी एक्स्प्रेस गाडीचा विस्तार किनवट पर्यंत करण्याची मागणी खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्याकडे किनवट शिवसेना युवा तालुका प्रमुख अजय कदम यांनी केली आहे.नांदेड - मुंबई तपोवन



एक्स्प्रेस नांदेड पुणे पनवेल एक्स्प्रेस नांदेड बंगळूर या एक्स्प्रेस रेल्वे गाड्यांच्या विस्तार आदीलाबाद पर्यंत करावा ही मागणी अनेक दिवसांपासून होतं आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## बाजारभाव

| | |
|---|---|
| सोने | ₹ ९९,०५८ (१० ग्रॅम) |
| चांदी | ₹ १,०६,१६७ (१ किलो) |
| डॉलर | ₹ ८६.०७ -५५ पैसे |
| सेन्सेक्स | ८१,११८.६० -५७३.३८ |
| निफ्टी | २४,७१८.६० -१६९.६० |

## निवडक

### वित्तीय निकाल आणि वार्षिक अहवालांमधील अंतर कमी करा : सेबी

**मुंबई :** बाजार नियामक सेबीने शुक्रवारी मुख्य वित्तीय अधिकाऱ्यांना (सीएफओ) आर्थिक निकालांची घोषणा आणि संपूर्ण वार्षिक अहवालांच्या प्रकाशनामधील अंतर कमी करण्याचे आवाहन केले. या आवाहनाचा उद्देश गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढवणे आहे. याव्यतिरिक्त, सीएफओना ऑडिट समित्या आणि ऑडिटर्सशी त्यांचे संबंध अधिक दृढ करण्यास प्रोत्साहित केले आहे. त्यामुळे अधिक सहयोगी आणि जबाबदार आर्थिक प्रकटीकरण सुनिश्चित होतील, असे सेबीचे पूर्णवेळ सदस्य अनंत नारायण यांनी येथे एका कार्यक्रमात सांगितले.

### सॅनलॅम-श्रीराम समूहातर्फे श्रीराम वेल्थ

**मुंबई :** श्रीराम समूहाने दक्षिण आफ्रिकेच्या सॅनलॅम या वित्तीय सेवा कंपनीच्या सहकार्याने भारतात संपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्दिष्टाने श्रीराम वेल्थ लिमिटेड या संयुक्त कंपनीची स्थापना केली आहे. उभय समूहांचा श्रीराम वेल्थ लिमिटेड हा ५०:५० संयुक्त धोरणात्मक उपक्रम आहे. आगामी पाच वर्षांत ५० हजार कोटींच्या ॲसेट अंडर ॲडव्हाइस (एयूए) पुरविण्याचे उद्दिष्ट आणि पाच वर्षांत ५०० संपत्ती व्यवस्थापन तज्ज्ञांना टीममध्ये सामील करण्याची योजना असल्याचे श्रीराम वेल्थचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ विकास सतीजा आणि सॅनलॅम समूहाचे सीईओ पॉल हॅनरॅटी म्हणाले.

## भू-राजकीय तणावाचा बाजारावर प्रभाव, दोन सत्रात गुंतवणूकदारांचे

# ८.३५ लाख कोटींचे नुकसान

**इस्रायल-इराणमधील युद्ध आणि विदेशी निधी बाहेर जाण्याच्या भीतीने गुंतवणूकदारांची सावध भूमिका**



- तेल दर भडक्याने दुसऱ्या दिवशीही घसरण
- दोन्ही निर्देशांक सुमारे १ टक्क्याने घसरले

**मुंबई :** शेअर बाजारातील दोन सत्रातील घसरणीने गुंतवणूकदारांचे ८.३५ लाख कोटींचे नुकसान झाले. मध्य पूर्वेतील तणाव वाढल्याने सेन्सेक्स जवळजवळ २ टक्क्यांनी घसरला आहे. तसेच ब्रेंट क्रूड तेलाच्या किमती भडकल्या आहेत. दोन दिवसांत, निर्देशांक १,३९६.५४ अंकांनी किंवा १.६९ टक्क्यांनी घसरला आहे. त्यामुळे बीएसई-सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल दोन सत्रात ८,३५,७९९.८५ कोटी रुपयांनी घसरून ४,४७,२१,३४३.३४ कोटी रुपये (५.१९ ट्रिलियन अमेरिकन डॉलर) झाले.

जागतिक बाजारात कमकुवतपणा आणि इस्रायलने इराणच्या राजधानीवर हल्ला केल्यानंतर ब्रेंट क्रूड तेलाच्या किमतीत वाढ झाल्याने गुंतवणूकदारांच्या भावनांवर परिणाम झाल्याने शुक्रवारी इक्विटी बेंचमार्क निर्देशांक सेन्सेक्स आणि निफ्टी जवळजवळ १ टक्क्यांनी घसरले. दरम्यान, इस्रायल आणि इराणमधील युद्ध आणि विदेशी निधी बाहेर जाण्याच्या भीतीमुळे गुंतवणूकदारांनी जोखीम समभागांच्या गुंतवणुकीपासून दूर राहिले.

सलग दुसऱ्या दिवशी घसरण झाल्याने, बीएसईचा ३० शेअर्सचा सेन्सेक्स ५७३.३८ अंकांनी किंवा ०.७० टक्क्यांनी घसरून ८१,११८.६० वर स्थिरावला. सकाळच्या व्यवहारादरम्यान, तो १,३३७.३९ अंकांनी किंवा १.६३ टक्क्यांनी घसरून ८०,३५४.५९ वर बंद झाला. बीएसईवर २,४६९ शेअर्सची घसरण झाली तर १,५१६ ने वाढ केली आणि १३७ शेअर्स अपरिवर्तित राहिले. एनएसईचा ५० शेअर्सचा निफ्टी १६९.६० अंकांनी किंवा ०.६८ टक्क्यांनी घसरून २४,७१८.६० वर बंद झाला. आठवड्याच्या आधारावर, बीएसई बेंचमार्क १,०७०.३९ अंकांनी किंवा १.३० टक्के घसरला आणि निफ्टी २८४.४५ अंकांनी किंवा १.१३ टक्के घसरला.

इस्रायलने इराणच्या प्रमुख क्षेत्रांवर हल्ला केल्यानंतर मध्य पूर्वेतील वाढत्या तणावामुळे गुंतवणूकदारांना सोन्यासारख्या सुरक्षित - आश्रयस्थानांच्या मालमत्तेकडे वळवले कारण धोकादायक इक्विटीजना सतत अडचणीचा सामना करावा लागत आहे. सेन्सेक्सवर्गवारीत अदानी पोर्ट्स, आयटीसी, स्टेट बँक ऑफ इंडिया, इंडसइंड बँक, एचडीएफसी बँक, टायटन, कोटक महिंद्रा बँक आणि अल्ट्राटेक सिमेंट आदी कंपन्यांचे समभाग घसरले. दुसरीकडे, टेक महिंद्रा, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, सन फार्मा आणि मारुती यांचे समभाग वधारले.


ब्रेंट क्रूडच्या किमती ७६ डॉलर प्रति बॅरलच्या जवळ पोहोचल्या, या वर्षीचा हा सर्वोच्च स्तर आहे. त्यामुळे तणाव कायम राहिल्यास महागाईची भीती निर्माण झाली आहे, जिओजित इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेडचे संशोधन प्रमुख विनोद नायर म्हणाले. जागतिक तेल बेंचमार्क ब्रेंट क्रूड ७.४४ टक्क्यांनी वाढून ७४.५२ डॉलर प्रति बॅरलवर पोहोचला. विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी गुरुवारी ३,८३१.४२ कोटी रुपयांची विक्री केली, असे एक्स्चेंज डेटानुसार दिसून आले.

### बहुतांश क्षेत्रांना फटका

बीएसई मिडकॅप निर्देशांक ०.३२ टक्के आणि स्मॉलकॅप निर्देशांक ०.३० टक्के घसरला. तसेच बीएसई क्षेत्रीय निर्देशांकांमध्ये, सेवा निर्देशांक २.०६ टक्के, बँकेक्स (१.०१ टक्के), एफएमसीजी (०.९४ टक्के), वित्तीय सेवा (०.८५ टक्के), धातू (०.८१ टक्के) आणि वीज (०.७५ टक्के) घसरले, तर हेल्थकेअर निर्देशांक आणि रिअल्टी क्षेत्राला लाभ झाला.

### डॉलरच्या तुलनेत रुपयाची ५५ पैशांनी गटांगळी

**नवा दर ८६.०७**



इराणच्या अणुऊर्जा केंद्रांवर इस्रायलने केलेल्या हल्ल्यानंतर मध्य पूर्वेतील वाढत्या तणावामुळे जागतिक तेलाच्या किमतीत वाढ आणि डॉलर मजबूत झाल्यामुळे शुक्रवारी रुपया अमेरिकन डॉलरच्या तुलनेत ५५ पैशांनी घसरून ८६.०७ (तात्पुरता) वर बंद झाला. जागतिक तेल बाजारात ब्रेंट क्रूड, फ्युचर्स ट्रेडमध्ये ७.२७ टक्क्यांनी वाढून ७४.४० डॉलर प्रति बॅरल झाला. इंटरबँक फॉरेक्स मार्केटमध्ये रुपया डॉलरच्या तुलनेत ८६.२५ वर उघडला आणि ८५.९२-८६.२५ च्या श्रेणीत व्यवहार करत ८६.०७ (तात्पुरता) वर बंद झाला, जो त्याच्या मागील बंदपेक्षा ५५ पैशांनी वाढला. गुरुवारी स्थानिक युनिट ८५.५२ वर स्थिरावले होते.

## सोने विक्रमी १.०१ लाखांवर

**नवी दिल्ली :** इराणवर इस्रायलच्या लष्करी हल्ल्यानंतर वाढलेल्या तणावामुळे गुंतवणूकदार सुरक्षित संपत्तीकडे वळले. त्यामुळे शुक्रवारी राष्ट्रीय राजधानीत सोन्याच्या किमती २,२०० रुपयांनी वाढून १,०१,५४० रुपये प्रति १० ग्रॅम या विक्रमी पातळीवर पोहोचल्या. नंतर, सोन्याचा भाव सुरुवातीच्या दरापासून कमी झाला आणि तो ९९,९०६ रुपये प्रति १० ग्रॅमवर व्यवहार करत होता.

याआधी २२ एप्रिल रोजी, मौल्यवान धातूचा भाव १,८०० रुपयांनी वाढून १,०१,६०० रुपये प्रति १० ग्रॅम या आजीवन उच्चांकावर पोहोचला होता.

ऑल इंडिया सराफा असोसिएशनच्या मते, ९९.५ टक्के शुद्धता असलेल्या

### मध्य पूर्वेतील तणाव वाढल्याने मौल्यवान धातू २,२०० रुपयांनी वाढला


मौल्यवान धातूचा भाव १,९०० रुपयांनी वाढून १,००,७०० रुपये (सर्व कर समाविष्ट) प्रति १० ग्रॅम झाला.

जागतिक बाजारपेठेत वाढत्या जागतिक अस्थिरतेमुळे गुंतवणूकदारांनी सुरक्षित मालमत्तांकडे गर्दी केल्याने सोन्याचा भाव प्रति औंस ३,४४० डॉलरच्या पुढे गेला, असे मेहता इक्विटीजमधील कमोडिटीजचे उपाध्यक्ष राहुल कलंत्री यांनी सांगितले. जागतिक स्तरावर, स्पॉट गोल्ड २८.३० डॉलर प्रति औंस किंवा ०.८४ टक्क्यांनी वाढून ३,४१५.१३ डॉलर प्रति औंस झाला.

### चांदी १,१०० ने वाढून १,०८,१०० रु. किलो

शुक्रवारी चांदीच्या किमती १,१०० रुपयांनी वाढून १,०८,१०० रुपये (सर्व करांसह) प्रति किलो या सर्वकालीन उच्चांकावर पोहोचल्या. सोमवारी चांदी १,००० रुपयांनी वाढून १,०८,१०० रुपये प्रति किलो या आजीवन उच्चांकावर पोहोचली. मल्टी कमोडिटी एक्स्चेंज (एमसीएक्स)वर ऑगस्टमध्ये सर्वाधिक व्यापार झालेल्या मौल्यवान धातूच्या डिलिव्हरी करारांमध्ये सकाळच्या व्यवहारात २,०११ रुपयांची वाढ झाली आणि १,००,४०३ रुपये प्रति १० ग्रॅमचा विक्रमी उच्चांक गाठला.

## विदेशी गंगाजळी वाढून ६९६ अब्ज डॉलरवर



**मुंबई :** भारताची विदेशी गंगाजळी ६ जून रोजी संपलेल्या आठवड्यात ५.१७ अब्ज अमेरिकन डॉलरने वाढून ६९६.६५ अब्ज अमेरिकन डॉलरवर पोहोचला आहे, असे आरबीआयने शुक्रवारी सांगितले. ३० मे रोजी संपलेल्या आठवड्यात गंगाजळी १.२३७ अब्ज डॉलरने घसरून ६९१.४८५ अब्ज डॉलरवर पोहोचली होती. सप्टेंबर २०२४ अखेर विदेशी गंगाजळी ७०४.८८५ अब्ज डॉलरच्या सर्वोच्च पातळीवर पोहोचली होती.

शुक्रवारी जाहीर झालेल्या आकडेवारीनुसार, ६ जून रोजी संपलेल्या आठवड्यात, परकीय चलन मालमत्ता ३.४७ अब्ज डॉलरने वाढून ५८७.६८ अब्ज डॉलरवर पोहोचली आहे.

आरबीआयने सांगितले की, आठवड्यात सोन्याचा साठा १.५८ अब्ज डॉलरने वाढून ८५.८८ अब्ज डॉलरवर पोहोचला. विशेष रेखांकन हक्क (एसडीआर) देखील १०२ दशलक्ष डॉलरने वाढून १८.६७ अब्ज डॉलरवर पोहोचले. या आठवड्यात भारताच्या आयएमएफकडे असलेल्या राखीव निधीत १४ दशलक्ष डॉलरची वाढ होऊन तो ४.४ अब्ज डॉलरवर पोहोचला, असे रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीवरून दिसून आले आहे.

## एलआयसीने पीडितांसाठी दाव्याची पूर्तता प्रक्रिया केली शिथिल





**नवी दिल्ली :** भारतीय जीवन विमा महामंडळाने (एलआयसी) शुक्रवारी सांगितले की, त्यांनी एअर इंडिया विमान अपघातातील पीडितांसाठी दाव्याची पूर्तता प्रक्रिया शिथिल केली आहे आणि प्रक्रिया देखील जलद केली आहे. ते गुरुवारी अहमदाबाद येथे झालेल्या विमान अपघातात बाधित झालेल्यांना मदत करण्यास वचनबद्ध आहे आणि पीडितांसाठी दाव्याची पूर्तता जलद करेल, असे महामंडळाने म्हटले आहे,

एलआयसीने एलआयसी पॉलिसींच्या दावेदारांच्या अडचणी कमी करण्यासाठी अनेक सवलती जाहीर केल्या आहेत. मृत्यू प्रमाणपत्रांऐवजी, विमान अपघातामुळे पॉलिसीधारकाच्या मृत्यूचा सरकारी नोंदींमधील कोणताही पुरावा किंवा केंद्र/राज्य सरकार/विमान प्राधिकरणांनी दिलेली कोणतीही भरपाई मृत्यूचा पुरावा म्हणून स्वीकारली जाईल, असे विमा कंपनीने एका निवेदनात म्हटले आहे.

दावेदारांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि पीडित कुटुंबांना दावे जलदगतीने निकाली काढण्यासाठी सर्व प्रयत्न केले जातील. अधिक मदतीसाठी, दावेदार एलआयसीच्या जवळच्या शाखा किंवा विभागाशी संपर्क साधू शकतात. दावेदार एलआयसीच्या ०२२-६८२७६८२७ या कॉल सेंटरवर देखील कॉल करू शकतात, असे त्यात म्हटले आहे.

**बजाज अलियान्झ लाईफ इन्शुरन्सकडून दाव्यांच्या निपटाऱ्यासाठी कक्ष स्थापन**

दरम्यान, बजाज अलियान्झ लाईफ इन्शुरन्सने म्हटले आहे की, त्यांनी या दुर्घटनेमुळे प्रभावित झालेल्या ग्राहकांसाठी मृत्यू आणि अपंगत्वाच्या दाव्यांच्या प्रक्रियेला प्राधान्य देण्यासाठी एक समर्पित

**एअर इंडिया विमान अपघात**

विशेष दावे निपटारा कक्ष स्थापन केला आहे. अत्यंत तातडीने, या पॉलिसी दाव्यांचे जलद निपटारा करण्यासाठी एक जलद प्रक्रिया स्थापन करण्यात आली आहे, असे बजाज अलियान्झ लाईफ इन्शुरन्सने एका निवेदनात म्हटले आहे.

या दुर्दैवी घटनेला प्रतिसाद म्हणून, कंपनीने अपघातात बाधित झालेल्या पॉलिसीधारकांच्या कुटुंबांना मदत करण्यासाठी विशेष उपाययोजना सुरू केल्या आहेत. प्रक्रिया सुलभ करण्यासाठी, बजाज अलियान्झने नामांकित व्यक्ती, कायदेशीर वारस किंवा पॉलिसीधारकांना त्यांचे दावे प्रक्रिया करण्यासाठी सादर करणे आवश्यक असलेली किमान कागदपत्रे प्रक्रिया सूचीबद्ध केली आहे, असे त्यात म्हटले आहे.



### विमान अपघातातील पीडितांच्या पाठीशी रिलायन्स कुटुंब

**मुंबई :** नीता आणि मी तसेच संपूर्ण रिलायन्स कुटुंब या अहमदाबादमध्ये झालेल्या दुर्दैवी विमान अपघातामुळे झालेल्या जीवितहानीमुळे अत्यंत दुखः आणि वेदनेत आहोत. या दुःखद घटनेमुळे प्रभावित झालेल्या सर्वांना आम्ही मनापासून शोकसंवेदना व्यक्त करतो. या दुःखाच्या काळात, रिलायन्स मदत आणि बचाव कार्यासाठी पूर्णपणे आणि ठामपणे पाठीशी उभी आहे आणि शक्य त्या प्रत्येक प्रकारे मदतीसाठी तयार आहे. या अपरिमित दुःखाला सामोरे जाण्याची शक्ती, धैर्य मिळो, हीच प्रार्थना.

**- मुकेश डी. अंबानी,**
अध्यक्ष आणि एमडी,
रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड

### नेत्रासाठी नवदृष्टीचा संकल्प; भाजप व आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल यांच्या तर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

उलवे (साबीर शेख):-भाजप व आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल यांच्या तर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर रवीशेठ पाटील यांच्या माध्यमातून मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. समाजासाठी एक सकारात्मक पाऊल असल्याने या शिबिराला उपस्थित राहून रवीशेठ पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रसंगी मा. खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, मा. आदर्श नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महेंद्रजी घरत, रामा कांत म्हात्रे, सीमा घरत, जितेंद्र म्हात्रे, नीलेश खारकर, संकल्प घरत, बाळाराम पाटील, रामदास नाईक, उत्तम कोळी, धीरज ओवळेकर, गणेश पाटील व इतर मान्यवर, सहकारी मोठ्या संख्येत उपस्थित होते.







# सावरकर सदनाचे बांधकाम जैसे थे

**भूमिका स्पष्ट करण्यासाठी सरकारला मुदतवाढ**



**मुंबई :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे ऐतिहासिक निवासस्थान असलेले दादर येथील सावरकर सदनाच्या बांधकामाला दिलेली स्थगिती उच्च न्यायालयाने आणखी तीन आठवडे वाढवली.

मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठाने सावरकर सदनला वारसा स्थळाचा दर्जा देण्याच्या महापालिकेने केलेल्या शिफारशीवर अंतिम निर्णय घेण्याबाबत भूमिका स्पष्ट निर्देश राज्य सरकारला दिले.

महापालिकेने जानेवारी २०१२ मध्ये वारसा स्थळ आणि राष्ट्रीय स्मारकांच्या यादीत सावरकर सदनच्या नावाचा समावेश केला होता आणि त्याबाबतच्या अंतिम शिफारशीचा प्रस्ताव सरकारकडे सादर केला होता. तथापि, इमारतीचा पुनर्विकासाचा घाट जात असून वारसा स्थळाचा दर्जा मिळण्यापूर्वी इमारत पाडली जाईल, अशी भीती व्यक्त करून याचिकाकर्ते आणि अभिनव भारत काँग्रेस या संघटनेचे अध्यक्ष पंकज फडणीस यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे.

याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठापुढे शुक्रवारी सुनावणी झाली. यावेळी, सावरकर सदनला वारसा स्थळाचा दर्जा देण्याच्या महापालिकेने केलेल्या शिफारशीवर अंतिम निर्णय घेण्याबाबत भूमिका स्पष्ट करण्यासाठी वेळ देण्याची मागणी अतिरिक्त सरकारी वकील प्राची ताटके यांनी न्यायालयाकडे केली. ती मान्य करून न्यायालयाने सरकारला उत्तर दाखल करण्यासाठी तीन आठवड्यांची मुदत दिली. तसेच, सदनचे बांधकाम यथास्थिती ठेवण्याबाबत दिलेला आदेशही तोपर्यंत कायम राहील, असेही स्पष्ट केले.

## कौटुंबिक वादात मुलांची ससेहोलपट थांबणार

### जिल्ह्यांमध्ये विधी सेवा कक्ष कार्यान्वित



**मुंबई :** पती-पत्नींमधील कौटुंबिक वादात लहान मुलांची होणारी ससेहोलपट थांबणार आहे. अशा प्रकरणात मुलांची होणारे कोंडी सोडवण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये विधी सेवा कक्ष नोव्हेंबरपासून कार्यान्वित केलेला आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाने उच्च न्यायालयात दिली.

याबाबत मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठाने दखल घेत यासंबंधित याचिका निकाली काढली. कौटुंबिक वादातील लहान मुलांच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी व्यापक योजना अस्तित्वात आहे. ही योजना सप्टेंबर २०२४मध्ये लागू झाली आणि राज्यात कार्यरत आहे. या योजनेचा एक भाग म्हणून, नोव्हेंबर २०२४ पर्यंत सर्व जिल्ह्यांमध्ये मुलांसाठी विधी सेवा युनिट्स स्थापन करण्यात आले आहेत, अशी माहिती महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाने न्यायालयाला दिली.

मुंबईतील वकील श्रद्धा दळवी यांनी ॲड. ॲशले कुशर यांच्यामार्फत ही याचिका दाखल करण्यात आली होती. त्यात मुलांचा ताबा, भेट आणि लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण कायदा, २०१२ (पॉक्सो कायदा) या अंतर्गत असलेल्या प्रकरणांमध्ये स्वतंत्र विधी सल्लागार नियुक्त करण्यासाठी निर्देश देण्याची मागणी करण्यात आली होती. अनेकदा कुटुंबातील वादांमध्ये मुले अधिक भरडली जातात. त्यांना स्वतंत्र विधी प्रतिनिधित्वाद्वारे मते व्यक्त करण्याचा अधिकार असला पाहिजे, असा दावा याचिकेत केला होता.

## तिन्ही रेल्वेवर रविवारी ब्लॉक

**मुंबई :** अभियांत्रिकी आणि देखभालीची कामे करण्यासाठी मध्य रेल्वेच्या मुख्य आणि हार्बर मार्गावर रविवारी मेगा ब्लॉक घेण्यात येणार आहे. तसेच पश्चिम रेल्वे मार्गावरही ब्लॉक असल्याने रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे हाल होणार आहेत.

मध्य रेल्वेच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई ते विद्याविहार स्थानकादरम्यान अप आणि डाऊन धीम्या मार्गावर सकाळी १०.५५ ते दुपारी ३.५५ पर्यंत ब्लॉक घेण्यात आला आहे. ब्लॉक कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून सकाळी १०.४८ ते दुपारी ३.४५ पर्यंत सुटणाऱ्या डाऊन धीम्या सेवा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई आणि विद्याविहार स्थानकांदरम्यान डाऊन जलद मार्गावर वळविण्यात येतील. या लोकल भायखळा, परळ, दादर, माटुंगा, शीव आणि कुर्ला स्थानकांवर थांबतील आणि पुढे विद्याविहार स्थानकावर डाऊन धीम्या मार्गावर वळवल्या जातील.

पश्चिम रेल्वे मार्गावर सांताक्रुझ आणि गोरेगाव स्टेशनदरम्यान सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत अप आणि डाऊन धीम्या मार्गावर पाच तासांचा ब्लॉक घेण्यात येईल.